

छात्र
प्रबोधन
सौर आषाढ शके १९२१
वर्ष ७ अंक १२
ज्ञान प्रबोधिनीचे कुमारांसाठी अभिनव मासिक!


# मुलामुलींनी मुखपृष्ठासाठी पाठविलेली अन्य चित्रे



चि.चिन्मय साळुंके, इ.३री
मित्रकुंज कॉलनी, ६अ साक्री रोड, धुळे.



कु.अलकनंदा चुनेकर, इ.८वी
११ संगीता,वनाज कॉर्नर,कोथरुड २१



चि.केदार मेहता, इ. ९वी
१२२ शुक्रवार पेठ, पुणे २



कु. तृषा पाटील, इ. ८ वी
'भगवंत' देशमुख प्लॉट,उपळाई रोड,बार्शी.

# अंतरंग

छात्र प्रबोधन
वर्ष ७ अंक १२
सौर आषाढ
शके १९२१

१ **संवाद :** महेंद्र सेठिया
३ **कथा : वनराणी :** कु. कल्पना सावंत
५ **सुसंवाद :** कु. गुंजन कुलकर्णी
७ **कथा : लेवियाड :** चि. ज्ञानेश अयाचित
१० **कविता पानोपानी :**
**असेच साने गुरुजी होते :** चि. तन्वीर शेख
**शब्दांची किमया :** चि. आदित्य नाईक
**आजी :** कु. हर्षदा पोरे
**हुशार :** कु. मीनल कोठावदे
१२ **गरज माझी आजी-आजोबा :** कु. दीपिका पवार
१४ **सफर एका सरहद्दीची :** कु. दिप्ती हाजिरनीस
१५ **कथा : धाडसी नंदू :** चि. स्वप्नील कोरगांवकर
१७ **फुलाचे आत्मकथन :** चि. किरण मार्के
१८ **पेटंट :** कु. मधुरा पोफळे व कु. कल्याणी देव
१९ **विजयदुर्ग किल्ल्याचा इतिहास :** कु. अश्विनी जाधव
२२ **उतू नका मातू नका :** कु. जाई ताकमोगे
२३ **पर्यावरण विचार :** चि. विठ्ठल चव्हाण
२४ **इतिहास बदलणारा कुत्रा :** चि. प्रयाग सेठिया
२५ **एप्रिल-मे-जून मधील शिबिरे**
२७ **सिंहावलोकन सातव्या वर्षाचे**
३२ **जुलै महिन्याचा उपक्रम, संपादकांचे दौरे**

इवली शल्ये रुपती खुपती,
मात करु दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख लेऊनी
ने ज्योतिर्जगतात।

**संपादक, प्रकाशक**
महेन्द्र सेठिया
**संपादक मंडळ**
महेन्द्र सेठिया B.E.M.Ed.
शैलजा देशमुख M.A.M.Ed.
दत्ता श्री. टोळ B.A. B.COM.
विवेक पोंक्षे M.SC.B.Ed.
**मुखपृष्ठ (मोझॅक पद्धत)**
कु. अमृता मेहेंदळे, कु. अनुजा पंडित
(इ. १०वी, दोघीही सातारा)
**मलपृष्ठावरील कविता**
रविंद्रनाथ ठाकूर यांच्या कवितेचा स्वैर
अनुवाद - डॉ. स्वर्णलता भिशीकर
**मलपृष्ठावरील चित्रे**
कु. दिप्ती भडभडे, (इ.८वी)
**अक्षरजुळणी**
प्रिंट लिंक, पुणे

**संपर्क पत्ता**
'छात्र प्रबोधन'
ज्ञान प्रबोधिनी
५१०, सदाशिव पेठ,
पुणे-४११०३०
दूरभाष ०२०-४४७७६९१, ४४७८०९५
फॅक्स : ०२०-४४९१८०६
E-mail-jnana.jptrust@axcess.net.in

**प्रकाशन दिनांक**
राष्ट्रीय सौर १० आषाढ, शके १९२१.
१ जुलै १९९९.
**वर्गणी**
**वार्षिक-** रु.१२५/- **द्वैवार्षिक** रु.२४०/-
**त्रैवार्षिक-** रु.३५०/- **आजीवन** रु.२०००/-
**भारताबाहेर**
**वार्षिक -** ३० डॉलर

## संवाद

प्रिय प्रबोधक मित्र-मैत्रिणींनो,

बघता बघता मासिकाचे सातवे वर्ष संपले. या वर्षातला हा शेवटचा अंक तुम्हा मुला-मुलींच्या साहित्याने-चित्रकृतींनी सजतोय याचा विशेष आनंद होतोय. या वर्षात तुमच्या कलाकृतींनी नटलेले २ अंक काढण्यात आपण यशस्वी झालो, त्याबद्दल तुम्हा सर्वांचे मन:पूर्वक अभिनंदन! गेल्या वर्षभरातील लेखांची सूची व मासिकाच्या वाटचालीचा आढावा अंकाच्या शेवटी दिला आहे. त्यातून वर्षभरातील लेखांमधील वैविध्य तुमच्या लक्षात येईल. गेल्या वर्षभरातले सर्व अंक एकत्र करून १२ अंकांचा एकत्र संच बांधणी करून ठेवा. पुढच्या वाटचालीमध्ये हा संच, नक्कीच तुम्हाला संदर्भग्रंथासारखा उपयोगी पडेल. वेळ मिळेल तेव्हा मद्दाम हा संच, त्यातील काही लेख वाचा. बऱ्याच वेळा पूर्वी वाचलेल्यापेक्षा वेगळा अर्थ आपल्याला जाणवतो,असे तुमच्या लक्षात येईल.

'कारगिल'मधील युद्धाबाबत रोजच्या घडामोडी वाचत आहात ना! **'विज्ञान ज्ञान अमुचे परिपूर्ण होवो. अभ्यास देशस्थितीचा समतोल चालो'** असे प्रबोधिनीच्या प्रार्थनेत म्हटले आहे. त्यानुसार रोजच्या पुस्तकी अभ्यासासोबतच वर्तमानाचे, देशपरिस्थितीचे आपल्याला सतत भान असावे यासाठी त्याबाबतचे वाचन,चर्चा आपण करायला हवी व यथाशक्य प्रतिसादही द्यायला हवा. 'कारगिलबाबत जनजागरण' असा उपक्रम पान क्र. ३२ वर सुचवला आहे. तो वाचून त्याप्रमाणे आपापल्या ठिकाणी कृतियुक्त प्रतिसाद आपण द्यावा. अत्यंत बिकट परिस्थितीमध्ये, अनेक संकटांवर मात करत आपले जवान आपल्या साऱ्यांच्या सुरक्षिततेसाठी प्राणपणाने लढत आहेत याची जाणीव आपण सारे ठेवू या. त्यांना आपल्या सदीच्छा, पाठिंबा तर व्यक्त करूच या, पण हा देश वर्षानुवर्ष सुरक्षित ठेवण्याचे जवानांचे मनोधैर्य वाढविण्यासाठी विविध क्षेत्रांमध्ये पराक्रमाची शिखरे पादाक्रांत करण्याचा संकल्पही आपण सर्वांनी करावा असे मला वाटते. आपल्यातली निर्भयता, धाडस, राष्ट्रप्रेम वाढविण्याचा प्रयत्न जाणीवपूर्वक आपण केला तर धारातीर्थी शहीद झालेल्या जवानांना ती खरी श्रद्धांजली ठरेल.


दहावी-बारावीच्या परीक्षांचे निर्णय याच महिन्यात जाहीर झाले आहेत. विविध गावांमध्ये छात्र प्रबोधनचे सभासद गुणवत्ता यादींमध्ये आल्याचे त्यांनी कळवले आहे. त्या सर्वांचे व अन्यही प्रबोधकांचे मन:पूर्वक अभिनंदन! सर्वांनीच आपापला निर्णय आम्हाला कळवून आपला आनंद आमच्यापर्यंत पोहोचवावा अन् आमचाही आनंद वाढवावा.

येत्या वर्षातील दिवाळी अंक हा विसाव्या शतकातील शेवटचा दिवाळी अंक असणार आहे. तेव्हा त्यामध्ये काय वेगळेपण असावे, कोणकोणते लेख असावेत, कोणत्या नवीन कल्पना याव्यात याबाबत तुमच्या कल्पना, या महिनाअखेर आमच्यापर्यंत आवर्जून पोहोचवाव्यात. नुसता दिवाळी अंकच नाही तर वर्षभरासाठीही लेखमालांचे काही विषय अवश्य सुचवावेत. या सर्व सुचनांचे, कल्पनांचे स्वागत आहे.

या अंकातील लेखक, कवी अन् चित्रकार अशा सर्व कलाकारांचे पुन:श्च मन:पूर्वक अभिनंदन! अन् उत्तुंग भरारी मारण्यासाठी मन:पूर्वक शुभेच्छा! इतरही अनेक प्रबोधकांना तुमच्या साहित्यातून लेखन करण्याची स्फूर्ती मिळेल असा विश्वास वाटतो. नवीन शैक्षणिक वर्षातले तुमचे संकल्प समजून घ्यायला निश्चितच आवडतील.

बरंय तर मग...

सस्नेही तुमचा



(महेन्द्र सेठिया)

# ज्ञान प्रबोधिनी परिचय सहल

### २१-२२-२३ ऑगस्ट ९९ (शनिवार-रविवार-सोमवार)

ज्ञान प्रबोधिनीच्या कार्याबद्दल ज्यांना आस्था आहे, ते काम जवळून बघण्याची ज्यांची इच्छा आहे व त्यासारखे काही सर्व आपल्याही गावात उभे राहावे, अशी मनीषा आहे, अशा सर्वांसाठी ३ दिवसांची **'प्रबोधिनी परिचय सहल'** योजली आहे.

त्यामध्ये पुणे-निगडी-साळुंबे व खेड-शिवापूर येथील शिक्षण-संघटन-संशोधन-आरोग्य-उद्योग व ग्रामविकसन प्रभागातील विविध विभाग, प्रकल्प पाहणे व तेथील कार्यकर्त्यांचा परिचय करून घेणे, असा सर्वसाधारण कार्यक्रम असेल.

२० ऑगस्ट रोजी मुक्कामाला अथवा २१ ऑगस्ट रोजी सकाळी ७.०० पूर्वी आपण ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथे यावे. २३ ऑगस्ट रोजी सायं. ४.०० वा. पुण्यात सहल संपेल.

**सहलीचे शुल्क रु. ३००/-** असून त्यामध्ये २१-२२-२३ ऑगस्टचा निवास-भोजन-प्रवास खर्चाचा समावेश आहे. (बरोबर येताना स्वत:चे पांघरुण घेऊन यावे.) सहलीचे शुल्क मुख्य अथवा स्थानिक कार्यालयात ५ ऑगस्टपूर्वी भरून नावनिश्चिती करावी. (आयत्या वेळी शुल्क भरून सहलीला कोणी येऊ नये.) **ही सहल प्रमामुख्याने वय वर्षे १८ व वरील वयोगटातील सदस्यांसाठी योजली आहे.** आपण केव्हा येणार आहात व केव्हा परत जाणार आहात हे शुल्क भरताना कळवावे.

**ज्ञान प्रबोधिनीमध्ये आपणा सर्वांचे स्वागत आहे!**

# वनराणी

कल्पना सावंत

एक होती वनराणी. ती फारच देखणी होती,झाडाझुडपांनी,छान छान फुलांनी सजलेली होती. ती सगळ्यांवर प्रेम करायची. कुणाचाही द्वेष करायची नाही.तिचा चेहरा सदा हसरा,फुललेल्या फुलासारखा होता. कुणीही दुःखी नसावे,सगळ्यांनी आनंदी असावे,असे तिला वाटे. कुणी रडताना दिसले, कुणी अश्रू ढाळताना दिसले,की वनराणी लगेच त्याच्यापाशी जायची. त्याची आसवे पुसायची. त्याला मदत करायची. म्हणूनच वनराणी सगळ्यांना फार आवडे.

एकदा वनराणीने पाहिले की, धरती रडत होती. इकडे-तिकडे लोळत,फारच तळमळत होती. वनराणीने धरतीला विचारले,''काय गं बाई झाले तुला? सहन करतेस सगळ्यांचा भार. देतेस सगळ्यांना आधार. तुला कसला झाला आजार?''धरती म्हणाली,''काय बाई सांगू? मी सगळ्यांना आधार देते,पण मला कुणाचा आधार नाही. उन्हाळा असो,पावसाळा असो,माझे आपले हालच. सूर्याच्या उन्हाने तापते. अंगाची लाही लाही होते.फारच बसतात चटके. पावसाळा सुरू होतो. डोंगरमाथ्यावरून पाणी येते. ते फारच दांडगाई करते,माझे अंग ओरबाडून जाते.माझी माती वाहून नेते. दगड-धोंडे वर येतात. माझी खूप झीज होते. मी अशक्त बनते. सांग बाई,तू तरी सांग. कसे संपतील माझे हाल? आहे का काही उपाय? मी धरते तुझे पाय.''

वनराणी म्हणाली,''धरती,धरती रडू नको. अश्रू मुळीच काढू नको. तुझे हाल संपतील. तू सुखात राहशील. माझ्याकडे उपाय आहे खास,तुझा दूर होईल त्रास.''

धरती उत्सुकतेने म्हणाली, ''खरंच वनराणी? खरंच माझे संपतील हाल?''

''हो,हो,अगदी खरं. तुझे हाल संपतील. तू सुखी होशील.'' वनराणी म्हणाली.

''मग सांग सांग लवकर,काय मी करू?'' आनंदीत होऊन धरतीनं विचारलं.

''झाडे,झुडपे,वेली हीच माझी लेणी.आहेत फारच गुणी. दे त्यांना आधार. दे त्यांना खायला,प्यायला. ती तुला सुखी करतील. उन्हाचा ताप दूर करतील. तुला वारा घालतील.तुला सशक्त करतील.''वनराणीने सांगितले.

वनराणीने उपाय सांगितला. धरतीला आनंद झाला. ती म्हणाली, ''वा!फारच छान!मी झाडाझुडपांना आधार देईन. त्यांना माझ्या अंगाखांद्यावर वाढवीन. त्यांना अन्नपाणी देईन. त्यांची काळजी घेईन.''

मग वनराणीने धरतीला थोपटले. धरतीला बरे वाटले. धरतीने झाडाझुडपांना आधार दिला. त्यांचे पालनपोषण केले.

पावसाळा सुरू झाला. डोंगरमाथ्यावर पाणी पडले. ते उड्या मारीत आले. धरतीला बोचकारू लागले. झाडाझुडपांकडे आले. त्यांच्याशी झटापट करू लागले. झाडाझुडपांनी काय केले? पुष्कळशा पाण्याला पकडून ठेवले. धरतीची माती घट्ट पकडली. ती पाण्याला नेता नाही आली. झाडाझुडपांनी धरतीची झीज थांबवली. धरतीला आनंद झाला.



तिने झाडाझुडपांना खाऊ दिला. झाडाझुडपांनी पाणी पकडले. ते धरतीने खोलवर नेले. आपल्या कोठारात साठविले.

पुढे आला कडक उन्हाळा. सूर्याची किरणे सरळ आली. ताप द्यायला लागली. झाडाझुडपांनी त्यांना अडविले. त्यांचे तडाखे स्वत: झेलले. धरतीवर सावली केली. धरतीला गारवा दिला. फांद्यांनी तिला वारा घातला. धरती थंड राहिली. ती खूष झाली. झाडांनी उन्हाशी झुंज दिली. त्यांना खूप तहान लागली. धरतीला त्यांची दया आली. तिच्या कोठारात पाणी होते. ते तिने झाडांना पाजले. त्यांना तृप्त केले. उन्हाळ्यावर मात केली. झाडांना हिरवी पालवी फुटली. धरतीने झाडांना आधार दिला. झाडांनी धरतीची काळजी घेतली.

वनराणी हिरवी पैठणी नेसली. ती फिरायला बाहेर पडली. हवा तिच्याभोवती घुटमळली. हवा होती वैतागलेली. दिसत होती थकून गेलेली, कपाळावर होत्या आठ्या, लाटांसारख्या मोठमोठ्या,चेहरा होता हिरमुसलेला, दिवसा दिसणाऱ्या चंद्रासारखा.

वनराणीने हवेला विचारले,''का गं बाई तू अशी? कोमेजलेली कळी जशी!''

हवेने मोठा उसासा सोडला. वनराणीकडे कटाक्ष टाकाला. ती म्हणाली,''काय बाई सांगू? सगळ्यांना हवाय प्राणवायू. नको कुणाला कार्बनवायू. सांग बरं कसा वाटू, माझ्याकडला अल्पसा प्राणवायू? थकून गेले वाटता वाटता, प्राणवायू सगळ्यांना थोडा थोडा.''

वनराणी म्हणाली,''खरंच बाई, तुझं काम जिकिरीचं, पण फारच महत्त्वाचं. प्राणवायू सगळ्या जीवांचा जीव. तो तर तुझ्यावरच अवलंबून. तुझं काम हलकं करायला, मी सांगते उपाय तुला.''

''अगं, मग सांग तरी, काय करू गं सुंदरी?'' हवेने विचारले.

वनराणी म्हणाली,''ही बघ माझी झाडेझुडपे, वेली. ती तुला मदत करतील. तुझं काम हलकं करतील.''

''काय करतील?'' हवेने विचारले.


''कार्बनवायू शोधून घेतील. प्राणवायू तुला देतील. तुझा प्राणवायूचा पुरवठा वाढवतील. कार्बनवायू कमी करतील. प्राणवायू सगळ्यांना देता येईल. तुझी चिंता दूर होईल.'' वनराणीने सांगितले.

हवा आनंदित झाली. ती बोलली, ''वा! वा! वा! फारच छान. सांग तर तुझ्या झाडाझुडपांना मला मदत करायला.'' वनराणीने आज्ञा केली. झाडे, झुडपे, वेली हवेच्या मदतीला धावली. कार्बनवायू शोधून घेतला. प्राणवायू भरपूर मिळाला. सगळ्यांना भरपूर देता आला. झाडे, झुडपे, वेलींनी हवा शुद्ध केली. हवेला खूपच आनंद झाला. उत्साहाने कामाला लागली. प्राणवायू वाटायला लागली. कमी झाला हवेचा त्रास. मग वनराणीने झोप घेतली. ती उंच डोंगरावर गेली. जेथे असते दाट रान, तेथे पाऊस पडतो छान. वनराणीची कृपा झाली. पावसाला सुरुवात झाली. धरतीला पाणी मिळाले. नद्यानाल्यांना पाणी मिळाले. डोंगरावरचे रान हिरवेगार झाले. सगळे आनंदाने नाचायला लागले. हसायला लागले. गायला लागले.

वनराणी ही वनराणी
गाते आनंदाने गाणी
झाडे लावा, झाडे जगवा
धरती वाचवा, पाणी साठवा.

**कल्पना सावंत**, इ. ९वी
आचार्य विनोबा भावे माध्यमिकविद्यालय,
कुणेकरी, सावंतवाडी
**चित्रकर्ती – नमिता पाषाणकर**,इ.१०वी

## छात्र प्रबोधनद्वारा
# राखी निर्मिती व विक्री उपक्रम



४-५ राख्यांचा कच्चा माल (पाकिटांमध्ये) छात्र प्रबोधनच्या मुख्य व स्थानिक कार्यालयामध्ये १ ऑगस्टनंतर उपलब्ध असेल. रेशमाच्या व बांबूच्या आकर्षक राख्या तयार करून नवनिर्मितीचा आनंद मिळवावा.तसेच मोठ्या प्रमाणावर राख्या विकून अनुभव अन् आर्थिक नफाही मिळवावा.

**एका पाकिटाची किंमत रु.१०/-**

(पोस्टेज खर्च रु.५/-)

# सुसंवाद

गुंजन कुलकर्णी

''सायली, उद्या माझ्याकडे राहायला येशील? आपण खूप गप्पा मारुया, मी एक नवीन पुस्तक आणलंय, ते वाचूया, येशील ना?'' ऋतुजानं फोनवरून विचारलं. ''नको गं बाई, आई नाही येऊ देणार. ती आजकाल फारच चिडचिड करते. तिला बरं नसतं, त्यामुळं मला ती कुठंही पाठवत नाही. माझ्याशी घरातलं कुणी फारसं बोलतही नाही.'' सायलीनं आपल्या जिवलग मैत्रिणीजवळ मन मोकळं केलं.

सायली अन् ऋतुजा दोघी लहान-पणापासूनच्या मैत्रिणी. दोघींनाही गप्पा मारायला, खूप हिंडायला निरनिराळी पुस्तकं वाचायला, गाणी म्हणायला जाम आवडत असे. या सगळ्यामुळे तर त्यांची मैत्री जास्तच फुलत गेली होती. यंदा दोघींनीही बारावीची परीक्षा दिलेली.अभ्यासाच्या बाबतीतही दोघी साधारण बरोबरी-च्याच होत्या. किंबहुना सायली थोडी पुढेच असायची नेहमी.

बारावीचा निकाल हाती आला. मात्र सायलीला अपेक्षापेक्षा खूपच कमी गुण मिळाले . सायलीच्या आई-वडिलांनी तिला वैद्यकीय शाखेत पाठवायचा निर्णय जवळजवळ घेऊनच टाकला होता. त्यांनी तसं अनेकदा बोलूनही दाखवलं होतं. सायलीच्या निकालामुळे त्या दोघांचाही मोठाच अपेक्षाभंग झाला. परिस्थितीनं सगळ्यांना चांगलंच गोंधळात टाकलं.

सायलीची मन:स्थिती तर फारच वाईट झाली होती. अपेक्षापेक्षा कमी गुण, त्यातून आईचं सारखं तेच तेच बोलणं, ''इतके क्लास लावले, पाण्यासारखा पैसा ओतला. पण फायदा काय? झालंच ना सगळं वाटोळं! आता तू काहीच करू नकोस.दोन वर्ष घरी बस. मग तुझं लग्नच उरकून टाकू.'' बोर्डाकडे काही विषयांच्या उत्तरपत्रिकांच्या फेरतपासणींसाठी अर्ज केला. पण त्याचा फारसा उपयोग होईल, ही अपेक्षा ठेवणं, वेडेपणाचंच होतं.

या सगळ्यातून सायलीला बाहेर काढण्यासाठी ऋतुजानं किती प्रयत्न केले! यातूनही पुढे जाण्याच्या अनेक वाटा दाखवल्या, समजावून सांगितलं, वेगवेगळ्या विषयांत तिला गुंतवायचा प्रयत्न केला, असं काही मोठं संकट येऊनही, त्यावर मात करून, कुठल्या कुठे पोहोचलेल्या व्यक्तींची उदाहरणं दिली. हक्कानं रागावूनही ती सायलीला पुन्हा पूर्वीसारखी हसतमुख करण्याचा प्रयत्न करत होती. ''सायली, तू इतकी कमजोर आहेस का? एवढ्याशा संकटानं एवढी खचून गेलीस तर तू पुढे कशी जाणार? अगं, पुन्हा पुन्हा मागे वळून बघण्यापेक्षा पुढे बघ. तुझ्या ध्येयाकडे बघ.'' सायलीलाही तात्पुरता उत्साह येई, पण पुन्हा पहिले पाढे पंचावन्न. ''सगळं भवितव्य पुसूनच गेल्यासारखं वाटंतय गं, कधी कधी वाटतं आता



आपण काहीच करू शकणार नाही. आई, बाबा, दादा कुणीच माझ्याशी नीट बोलत नाही. वर्गातल्या इतर मुलींनीही वर्षभर माझ्याकडून मदत करून घेतली. आता कुणी बघतही नाही माझ्याकडे.'' सायलीच्या अशा बोलण्याने ऋतुजाही क्षणभर नाराज झाली. सायलीच्याच बाबतीत हे असं का घडलं?

जर माझ्या बाबतीत असं काही घडलं असतं तर माझे आई-बाबा असेच वागले असते का? क्षणभर तिच्या मनात विचार चमकला अन् मानेच्या एका झटक्यासरशी तिनं तो झटकूनही टाकला.तिला जाणवलं, तशी घरची एकूण परिस्थिती दोघींची सारखीच, पण आपल्या घरात 'संवाद' आहे. प्रत्येकजण या संवादाच्या माध्यमातून इतरांना जाणतो.इतरांच्या भावना जपायचा प्रयत्न करतो. एकमेकांना सांभाळून घेतलं जातं आपल्या घरात. ऋतुजाची, सायलीच्या आई-वडिलांशी चांगली ओळख होती.पण याप्रसंगी तिलाच काय, पण सायलीलाही तिचे आई-बाबा अनोळखी भासत होते. मनुष्य स्वभावाचा अंदाज येणं कठीण म्हणतात, पण ऋतुजाला जाणवलं, माझ्या आई-बाबांचा स्वभाव मला माहीत आहे. ते कोणत्या प्रसंगी कसे वागतील? ते मी सांगू शकते, असा विश्वास तिला वाटला.

आता परवाचीच गोष्ट! प्रसंग तसा साधाच, पण ऋतुजाच्या हळव्या मनात खोलवर रुतलेला. तिच्या मैत्रिणींनी तिच्या पोषाखावरून,



तिच्या नेहमीच साध्या राहण्याची खूप टिंगल केली. ''तुला माहीत आहे का ऋतुजा, मुलांना साध्या राहणाऱ्या मुली अजिबात आवडत नाहीत.'' स्वातीनं 'राज की बात' सांगितली. मनाला गोंधळात टाकणारा हा प्रसंग तिनं आवर्जून आई-बाबांना सांगितला होता. तिला आठवलं किती सहजपणे दोघांनी आपल्या मनातली चलबिचल शांत केली होती! बाबांचे शब्द तर तिला अजूनही आठवत होते, ''बेटा, आपली चांगली तत्त्वं आपण नेहमीच जपावीत. मग ती कुणाला आवडोत न आवडोत आणि एक सांगतो तुला, जगात चांगल्या व्यक्तींना नेहमीच चांगल्या गोष्टींची पारख असते.'' हे सगळं आठवलं अन् ऋतुजानं डोळे मिटून घेतले; एक दीर्घ श्वास घेतला. तिला आता खूप मोकळं मोकळं वाटत होतं. तिच्याही नकळत ती आपल्या कुटुंबाच्या आणखी जवळ गेली. प्रत्येकच घरात असा सुसंवाद साधला तर...सायलीच्याच कवितांच्या वहीत वाचलेल्या ओळी ऋतुजाच्या डोळ्यापुढे आल्या-

**नुसत्या नात्यांच्या धाग्यांनी**
**'घर'बांधता येत नाही**
**ते लगेच तुटून जातं**
**संशयाची कात्री लागल्यावर.**
**संवादाची सजावट असावी**
**घर छान दिसण्यासाठी.**
**नात्यांच्याही धाग्यांमधे**
**नसावा गुंता आणि गाठी.**

●●

**गुंजन कुलकर्णी,**
प्रथम वर्ष कला शाखा,
प्लॉट नं. ५१, सर्व्हे नं. ३२७/१ अ,
अंजली कॉलनी, करंजे तर्फ,
सातारा ४१५ ००२.
**चित्रकर्ती - गायत्री केळकर,** इ. ७वी

## हसा हसा

१. भागीरथीबाई - तुला किती वेळा सांगायचं, दूध सकाळी सहा वाजता आणत जा म्हणून!

गवळी - सहाला येणं जमणार नाही बाई. अहो, नळाला पाणीच मुळी सात वाजता येतं!

● ● ● ●

२. न्यायाधीश - जर तू खोटं बोललास तर कुठं जाशील याची कल्पना आहे का तुला?

आरोपी - हो! नरकात!

न्यायाधीश - आणि खरं बोललास तर?

आरोपी - जेलमध्ये !

संकलन -चि.हर्षल भक्त, इ.१०वी, पुणे

# लेवियाड

**ज्ञानेश अयाचीत**

‘‘आई ते पाहा किती सुंदर दृष्य आहे.’’ अंकिता म्हणाली. ‘‘होय बेटा, खरंच की!’’ ‘‘अनिकेत, दिसले का रे तुला?’’ ‘‘होय’’. अनिकेतने उत्तर दिले.

अनिकेत व अंकिता दोघेही अनुक्रमे बारा व दहा वर्षांची मुले. त्यांचे वडील श्री. आशिष शर्मा नामांकित शास्त्रज्ञ तर आई सुनिता शर्मा सुप्रसिद्ध खगोल शास्त्रज्ञ.

अनिकेत व अंकिता सहपरिवार गेले चार दिवस अंतराळात सुट्ट्या घालविण्यासाठी आपल्या ‘सेट-२बी’- या यानातून फिरत होते. या अंतराळा-तील सुट्ट्यांचे खास आकर्षण म्हणजे ९७ लाख किलोमीटरवरची ‘उल्का-पॉवर’ होय. ती उल्का त्यांना फिरताना, २ हजार किलोमीटरवरून पाहता येणार होती. म्हणून दोन्ही भावंडे आनंदात होती. आईने सांगितलेल्या तारखेला दोघेही शक्तिशाली दुर्बिणीतून अंतराळात लक्ष ठेवून होते.

आता ती उल्का त्यांच्या नजरेच्या टप्प्यात येऊन ठेपली होती. रंगीबेरंगी तुषाराचे फवारे सोडत ती उल्का मार्गक्रमण करीत होती.

‘‘बाबा, किती आकर्षक आहे ही उल्का.’’ अंकिता म्हणाली.

‘‘होय बेटा... हे पाहून मला इंद्रधनुची आठवण येते.’’

‘‘इंद्रधनु? इंद्रधनु? कसे असते? आम्हाला पण दाखवा ना.’’तेव्हा त्यांचे बाबा म्हणाले,‘‘बेटा, आम्हाला माफ कर.आमच्या भावी पिढीसाठी आम्ही निसर्गाचा आनंद राखून ठेऊ शकलो नाही. तिसऱ्या महायुद्धामुळे पृथ्वीवर प्राणहानी, वित्तहानी फार झाली नाही, पण तेथील वातावरण जीवसृष्टीस प्रतिकूल बनले. आपल्याला पृथ्वी सोडावी लागली. पण आपल्या सुदैवाने मनुष्यास अनुकूल असे वातावरण असलेला 'Earth's Symbol' हा दुर्मिळ ग्रह सापडला आणि आज आपण कृत्रिम ऑक्सिजनवर जगत आहोत.’’

यानातील शांततेला भेदत कंट्रोल रूममधून सूचक सायरन खणखणला. अनिकेतचे वडील कंट्रोल रूममध्ये गेले व सायरन बंद करून त्यांनी संपर्क संचाचे बटण दाबले. ते प्रा. रमण अय्यंगार होते.

‘‘हं, बोल रमण काय झाले?’’

‘‘आशिष, तू शक्य तितक्या लवकर Set-2b ला वळवून ताबडतोब World-x वर उतर.’’

‘‘काय? World-x वर, पण का?’’ तोपर्यंत सर्वजण कंट्रोलरूममध्ये दाखल झाले.

‘‘आम्हाला आत्ताच माहिती मिळाली की, उल्का-पॉवरने अचानक आपली दिशा बदलली आहे व ती ताशी दीड लाख किलोमीटर वेगाने तुमच्याकडे सरकत आहे.’’

‘‘काय! अरे पण हे कसे शक्य आहे?’’ गोंधळून आशिषने प्रश्न केला.‘‘अरे बाबा, सगळे शक्य आहे. After all, this is nature."


‘‘ठीक आहे. पण World-x वरच का?’’ ‘‘अरे, हे तर दुर्दैव आहे. ती उल्का ताशी १.५ लाख वेगाने सरकतेय आणि तुझ्या यानाचा वेग आहे फक्त ताशी १० हजार कि.मी. त्यामुळे Earth's Symbol वर पोहोचेपर्यंत तिसऱ्या किंवा चौथ्या यानात तुला ती उल्का गाठेल. म्हणून तुम्ही ग्रहावर पोहोचू शकत नाही. Set-2b च्या टप्प्यात केवळ World-x हाच ग्रह येतो. नाहीतर...’’

‘‘पण **त्या** ग्रहाची Testing अजून झाली नाही. मग कसे उतरायचे? हे अशक्य आहे.’’ सौ.सुनिता म्हणाल्या.

‘‘तुमचे म्हणणे योग्य आहे. पण त्याशिवाय दुसरा पर्याय नाही. संशोधनाद्वारे तेथे जीवसृष्टी आढळण्याची शक्यता आहे. आपण त्यांचा शोध लावण्यासाठी रोबोसुद्धा पाठविले होते.पण ते परत मिळू शकले नाहीत.’’

‘‘परिस्थितीच अशी आहे की, इकडे आड तिकडे विहीर, बरं, मी काहीतरी निर्णय घेतो.’’आशिष उत्तरला. ‘‘हो. पण उशीर करू नको. Best of Luck.’’ संचाचे बटन बंद करून आशिषने सुनिता व मुलांकडे पाहिले. सर्वजण भीतीने गांगरून गेले होते.

थोडा वेळ असाच गेला. आशिष उठला व यानाला World-x कडे वळवले. जसजसा World-x जवळ येऊ लागला, तसतसे सगळीकडे धुके पसरले. काहीच दिसेनासे झाले. सगळे घाबरून बसले होते. बघता बघता यान जमिनीवर उतरले. आशिषने आश्चर्ययुक्त भीतीने दरवाजा उघडला. समोरचे दृश्य पाहून ते तेथेच थबकले



आणि आता तर त्यांच्या आश्चर्याला पारावार उरला नाही. कारण समोर त्यांच्यासारखीच माणसे विचित्र पोषाखात पृथ्वीवरचीच भाषा बोलत होती.

''या, आपले या ग्रहावर स्वागत आहे.'' त्यातील एक त्यांना आदराने म्हणाला. ते दोघे एवढे गोंधळून गेले की त्यांना परग्रहवासीयांनी बोललेले शब्दसुद्धा ऐकू आले नाही. त्या परग्रहवासीयाने म्हटले, ''मि. शर्मा गोंधळून जाऊ नका. प्रथम तुम्ही आमचा पाहुणचार स्वीकारावा. नंतर तुम्हाला सर्व काही समजेल.'' जेव्हा ते चौघे भानावर आले तेव्हा त्यांना समजले की, हे परग्रहवासीय त्यांच्याच वंशाचे आहेत. त्यातील एकाचे नाव-ओरीयो. त्याने त्यांना सांगितले की, या ग्रहाचे नाव 'लेवियाड' म्हणजेच तुमच्या भाषेत देवांची भूमी, असे आहे. येथे पृथ्वीसमान पाणी, हवा, प्राणी, वनस्पती, अन्न आहे. येथील संस्कृती, तंत्रज्ञान, विज्ञान व मानवी जीवन खूप प्रगतीशील आहे. येथील लोकांना बहुतेक सर्व भाषा येतात. त्यांची त्या मानाने ज्ञानकक्षा विशाल आहे. तुम्ही या ग्रहाला दुसरी पृथ्वीच म्हणू शकता.''

तेव्हा मधेच अंकिता आनंदाने ओरडत म्हणाली, ''म्हणजे काका, मला आता इंद्रधनु पाहायला मिळेल.''

''हो का नाही, फक्त इंद्रधनुच नव्हे तर डोंगर, दऱ्या, पाऊस, सर्वकाही तुम्हाला पाहायला मिळेल.''ओरियो म्हणाला.

''मला एक कळत नाही. आमच्या अनेक मेगा पॉवरच्या रोबोंना या ग्रहाची माहिती काढण्यासाठी पाठविले होते. परंतु एकही रोबो परत आला नाही. असे का?'' आशिष म्हणाला. ओरियाने हसून उत्तर दिले, ''माफ करा. त्या रोबोंना आम्हीच निकामी केले; कारण आम्हाला आमची कोणतीही माहिती इतरांना कळू द्यायची नव्हती.''

''असे का?''

''तुमच्या स्वभावामुळे.''

''आमच्या स्वभावामुळे?

''होय.तुमच्या लालची स्वभावामुळे तुम्ही तुमची सुंदर पृथ्वी नष्ट केलीत. तुम्ही मतभेद, शत्रुत्व, जातीभेद, साम्राज्यविस्तार स्पर्धेत एकमेकांवर मात करण्यासाठी आपलाच नाश करून बसलात.''

''बरोबर आहे.''

''पण ओरियो मला एक कळत नाही की, आमच्या नाशाला विज्ञानही थोडेबहुत कारणीभूत होते. मग तुम्ही कसे वाचलात?''

''छान प्रश्न.पृथ्वीच्या विनाशाला विज्ञान जबाबदार नाही. कारण विज्ञान हाताळणारा माणूसच असतो. आता अग्नीने स्वयंपाक करायचा की जाळपोळ करायची हा प्रश्न आहे मानवी मनाचा. जर विज्ञान सद्सद्विवेकबुद्धिच्या हातात गेले तर देशाचे नव्हे तर जगाचे कल्याण होते. मी अगोदर म्हटल्याप्रमाणे लेवियाड हा पृथ्वीसारखाच , एक ग्रह आहे. अर्थातच लेवियाडमधेही अनेक देश आहेत, पण आम्ही सगळ्यांना

लेवियाडवासी म्हणून संबोधतो.जसे ‘वसुधैव कुटुंबकम्’तसे ‘लेवियाड कुटुंबकम्’ आहे. आम्ही सर्व कलह बाजूला ठेवून या आमच्या लेवियाडच्याच प्रगतीकडे सदा लक्ष दिले. येथील प्रत्येक लेवियाड-वासीयाला परस्परांबद्दल प्रेम, आदर, आपुलकी आहे. येथे कोणीही आळशी व कमचुकार नाही. इतकेच नव्हे तर येथे धर्म, जात यांचे अंशत: अस्तित्वसुद्धा तुम्हाला जाणवणार नाही. आम्ही आमची संस्कृती जपली.लेवियाड जपला.’’ ‘‘वा! खरंच ही देवांची भूमी आहे.’’

‘‘धन्यवाद ओरिया.तुम्हाला भेटून आम्हाला खूप आनंद झाला.’’

‘‘माफ करा आम्ही तुम्हाला येथे जास्त वेळ ठेवू शकत नाही. तुम्हाला तुमच्या ग्रहावर लवकरच परत जावे लागेल.’’

दोन-चार दिवस असेच आनंदात गेले. लेवियाडला सोडून जाण्याची वेळ आली. जाताना ओरियो म्हणाला, ‘‘मि.शर्मा आम्हाला तुमच्या स्मरणातून तुम्ही येथे अनुभवलेल्या घटना पुसायच्या आहेत.’’

‘‘म्हणजे?’’ आशिष.

‘‘म्हणजे,तुम्ही जेव्हा ग्रह सोडून जाल तेव्हा तुमच्या स्मरणात काहीही राहणार नाही.’’

‘‘ठीक आहे. मी समजू शकतो.’’ आशिष.

‘‘ह्या कॅप्सूल घ्या.’’

‘‘ठीक आहे.’’

पण अंकिता भलतीच निराश झाली. हे पाहून ओरियोने विचारले, ‘‘काय झाले बेटा?’’ अंकिता म्हणाली, ‘‘मला लेवियाड व इंद्रधनु सतत स्मरणात ठेवायचे आहे.’’


ओरियो थोडा वेळ तिच्याकडे पाहात होता. नंतर मंदस्मित करत म्हणाला,‘‘ठीक आहे. माझा विश्वास आहे तुझ्यावर. तू काहीही सांगणार नाहीस. तू कॅप्सूल घेऊ नकोस.’’

‘‘धन्यवाद! मी आपला विश्वास मोडणार नाही.’’

दोन यान पार करून Set-2b Earth's Symbol कडे रवाना झाला. अंकिता मात्र यानाच्या खिडकीतून एकटक लावून बघत होती. तेव्हा सुनिताने विचारले, ‘‘काय पाहातेस बेटा?’’ अंकिता म्हणाली, ‘‘तो ग्रह.’’ सुनिता म्हणाली, ‘‘आपण तेथे एक दिवस जरूर जाऊ शकू, तेव्हा बघ.’’ अंकिता का हसली हे कोणालाच कळले नाही.

**ज्ञानेश अयाचीत,**(९वी)
आर्यचाणक्य विद्यामंदिर,धाराशीव.
(हस्तलिखित स्पर्धा ९८-९९)
चित्रकर्ता - अभिषेक जोग, इ. १०वी

# जळू



**आ**युर्वेदात जळू हा प्राणी रक्तमोक्षणास वापरला जातो. आयुर्वेदानुसार जळूचे सविष व निर्विष, असे दोन प्रकार पडतात. निर्विषातील १)कपिला २) पिंगला ३) शंकूमुखी ४) मूषिका ५) पुंडरिकमुखी ६) सावरिक, या प्रकारांचा रक्तमोक्षणास वापर होतो. म्हणून आयुर्वेदाचार्य जळवा पाळतात.

जळूचा त्वचारोग, हत्तीरोग, आमवात, इंद्रलुप्त (चाई), गाठी, गळू, डोळ्यांना सूज इत्यादी रोगांवर उपयोग होतो.जळूचे ‘नर’ व ‘मादी’ असे भेद पडतात. जीवशास्त्रानुसार जळूचे३५० प्रकार पडतात. त्यातील Hirudo, Haemadipsa, Hirudinaria, Dinobdella या जळवा भारतात सापडतात. त्या गोडे पाणी, उष्ण कटिबंध, दमट जंगले, दलदल येथे सापडतात. जळू अर्धपरजीवी आहे. ती आपल्या 'Y' सारख्या जबड्याने भक्ष्यास जखम करून रक्त शोषते. तिला वर्षातून दोनदा रक्त मिळाले तरी पुरेसे ठरते.

जळूपासून मिळणाऱ्या रसायनांनी, कर्करोग, हृद्रोग, मोतीबिंदू इ. रोगांवर उपार होऊ शकतात. या रसायनांना आंतरराष्ट्रीय बाजारपेठेत मोठी मागणी आहे. आज जळूशेतीची आवश्यकता आहे. ब्रिटनने जळूच्या निर्यातीवर पुष्कळ पैसा मिळवला पण विषुववृत्तीय वातावरणात असूनही, भारत याबाबतीत उदासीन का?

कविश्रेष्ठ वर्डस्वर्थने जळूच्या प्रचंड वापरामुळे तिच्यावर ‘द लीच गॅदरर’ अशी कविता लिहिली आहे. जर्मनी, ब्रिटन जळूसंशोधनात आघाडीवर आहेत. ‘जळू विशिष्ट हालचालींद्वारे गणित करू शकते.’ हे शास्त्रज्ञांनी नुकतेच सिद्ध केले आहे.’

**नील पाठक,** इ. ९वी, टिळकनगर विद्यामंदीर, डोंबिवली.



# कविता पानोपानी




## ‘शब्दांची किमया’

शब्दांमुळे होते वेदना, वेदना शब्दांतून बोलते.
शब्दांमुळे होते दु:ख, सुख शब्दांतून डोलते.
शब्दांमुळे तुटू शकतात दाट मैत्रीचे बंध
शब्दांमुळे दरवळतो नव्या नात्याचा सुगंध
शब्दांमुळे होते युद्ध, क्रांती अथवा बंड
शब्दांमुळे त्यांचा मग रागही होतो थंड
शब्दांमुळे  कळतात आपल्याला दुसऱ्याचे विचार
शब्दांमुळे साध्य होतो कोणत्याही गोष्टीचा प्रचार
शब्दांमुळे होतात शत्रूसुद्धा मित्र
शब्दांमुळे साकार होते डोळ्यापुढे चित्र
शब्दांमुळे वहन होते ज्ञानाचे व युक्तीचे
शब्दांमुळे संघटन होते सर्वांमधल्या शक्तीचे
शब्दांमुळे स्वार होतो कोणी यशाच्या शिखरावर
शब्दांमुळे जडतो जीव माणसाचा माणसावर
शब्दांमुळेच रेशीम धागा जुळतो आपुलकीचा
मनामनातील मिटते अंतर सूर शब्दांना मिळता


**आदित्य प्रशांत नाईक, इ. ९वी**
३ ब/११६, भक्तीयोग सोसायटी,
वझिरा नाका, बोरिवली (पश्चिम), मुंबई-४०००९२.
**चित्रकर्ती – गीता लिमये, इ. ८वी**


## असेच साने गुरुजी होते

फुलांमध्ये रमत होते... मुलांमध्ये खेळत होते.
खरे सांगतो बरे मुलांनो... असेच साने गुरुजी होते.
बालमनाच्या वेदीवरती अखंड ज्यांच्या स्मृती तेवती
स्वातंत्र्याच्या संग्रामातही पाऊल ज्यांचे सदैव पुढती
चुकतही होते – पण त्यातुनि काही शिकतही होते ।।१ ।।


घाम गाळूनी – काम करावे ध्यास एकला ध्येय धरावे
मौन राहुनि कृतीमधुनचि बरेच काही सांगत होते
खरा मानूनी मानवधर्म, प्रेम जगी या अर्पित होते ।।२ ।।

मुले उद्याची तरुण पिढी हे जाणूनि त्यास घडविले
बलसागर बनवण्या भारता जीवन सारे अर्पण केले.
तन मन धन ह्या देशावरति ओवाळूनि जे टाकत होते।।३ ।।


**तन्वीर शेख,**
नेमळे, ता. सावंतवाडी, जि. सिंधुदुर्ग.
**चित्रकर्ता – चिन्मय पाटील, इ. ६वी**



**शब्द बापुडे केवळ वारा। अर्थ वाहतो मनात सारा। नीटनेटका शब्द पसारा। अर्थाविण पंगू।**




# आजी


माझी आजी माझा झोका होती
माझ्या बाबांच्या काळजाचा ठोका होती
आपडी, थापडी गुळाची पापडी
आजी म्हणे, 'तू माझी छकडी'
आजीची मी एकुलती एक नात
खाऊ द्यायला घेऊन जाई बाजारात
गावात सगळ्यांना होता आजीविषयी आदर
दांभिकतेची तिने नाही केली कदर
आयुष्यभर केली तिने सगळ्यांवर माया
सारखे कष्ट उपसताना झिजली तिची काया
खूप पहाटे उठायची अन् उशीराने झोपायची
कितीही काम असलं तरी खूप स्वच्छता राखायची
पोराबाळांत रमण्यात तिला वाटे आनंद
कर्मकांडात अडकण्याचा तिला नव्हता छंद
सवयच होती तिची खेळायची होऊन मुलात मूल
म्हणूनच केलंस का गं आजी आम्हाला, 'एप्रिल फूल?'

**हर्षदा पोरे**, इ. १०वी
मेहेंदळे वाडा, देव आळी, पेण ४०२ १०७
**चित्रकर्ती – अलकनंदा चुनेकर**, इ. ८वी

# हुशार

परीक्षा जवळ आली म्हणजे,
झोप लवकर येते
पहाटे गजर होत नाही,
याचेच नवल वाटते ।।१।।





परीक्षा जवळ आली म्हणजे,
सिनेमाही चांगला लागतो
न केलेल्या अभ्यासाचा
पेपर नकोसा वाटतो ।।२।।

परीक्षा जवळ आली म्हणजे,
कानावर पडतात गाणी
गणितात लक्ष लागत नाही,
आठवते कुठलीशी कहाणी ।।३।।



परीक्षा जवळ आली म्हणजे,
अभ्यासात संकटे येतात फार
या संकटावर करतो जो मात,
त्यालाच म्हणतात हुशार
।।४।।

**मीनल कोठावदे**, इ. ८वी,
हस्तलिखित – नंदनवन, रचना विद्यालय, नाशिक
(हस्तलिखित स्पर्धा ९८-९९)
**चित्रकर्ती – अमृता अत्रे**, इ. ८वी

# गरज माझी आजी-आजोबा

**दीपिका पवार**

**ना**शिकमधील अतिशय नामवंत डॉ. भांब्री यांनी ६ महिन्यांपूर्वी नाशिकमध्ये एका नवीन उपक्रमाला सुरुवात केली. त्यांनी म्हणे वृद्धांसाठी एक घर बांधले आहे. त्या घरामध्ये राहण्यासाठी आठवड्याची ठरलेली रक्कम आहे. ती भरून वृद्धांनी घरातील मनस्ताप विसरून दैनंदिन जीवनामध्ये बदल म्हणून यायचे. मला हे वाचून डॉ. डी. एस्. भांब्रींचे कौतुक करावेसे वाटले, पण दुसऱ्या बाजूला ही बातमी वाचून मला आश्चर्य वाटले.

आज माझा घरातील, कही क्षण ज्यांच्याविना जात नाही त्या आजी–आजोबांवर अशी वेळ का यावी, त्यांना घरातील आपल्या माणसांपासून दूर का जावे लागावे?

सकाळी मोठ्यांना नमस्कार करणे यापासून ते रात्री आजीने सांगितलेली गोष्ट ऐकणे इथपर्यंत आजी–आजोबांचा व माझा सहवास सतत असतो.

सकाळी क्लासला जाताना काय आणि शाळेत काय आजीच मागे लागते. पेन घेतले का? वही घेतली काय? आज प्रगतीपुस्तक न्यायचं आहे ना? ही पण आठवण आजीच करणार. कधी–कधी तिच्या या सूचनांचा, प्रश्नांचा राग येतो. पण तरीसुद्धा घरातून उतरून खाली गेटजवळ आल्यावर, आजीला टाटा करण्यासाठी माझा हात नकळत वर जातो आणि खिडकीत आजी नाही असं कधीच होत नाही. सतत हळू जा सांगणारी आजीच असते. खूप खूप प्रेम करणारे, खाऊ आणणारे, वेळेला जरा कठोर होणारे, आजोबाच असतात.



आजकालच्या धकाधकीच्या जीवनात तर आजी–आजोबा म्हणजे वेळेला उभे राहणारे आधारस्तंभच झाले आहेत. ते सतत बॅग भरूनच ठेवतात. ज्या मुलाकडे अडचण असते त्याच्याकडे मुक्काम वाढवायचा. खरं तर निवृत्त झाल्यानंतर स्वत:च्या मनासारखं जगण्याचे हे दिवस, त्यांनी आमच्यासारख्या नातवंडासाठी दान केले आहेत.

आज घराघरामध्ये टी.व्ही. पाहण्यावरून वाद होतात. त्यामध्ये आजी–आजोबा पण सामील आहेत. फरक एवढाच की त्यांना जरी संतवाणी, मायबोली सारख्या वाहिन्यांवरचे कार्यक्रम बघायचे असले तरी मला Discovery Channel ते बघू देतात. मी म्हटले की मला 'झी टि.व्ही.' बघायचा आहे. तर ते माझ्याशी वाद घालत नाहीत. त्याला–सुद्धा त्यांनी मर्यादा घातल्या आहेत.

संध्याकाळी विशिष्ट वेळीच कार्यक्रम बघायचे. नंतर मग तेही टी.व्ही.बघत नाहीत आणि मीही! हो पण वेळेचा सदुपयोग त्यांनी मला शिकवला.

आजी तर सतत स्वयंपाकघरात असते.आपल्या हातचे खाऊ–पिऊ घालावे, याची तिला फारच हौस! माझ्या सगळ्या मित्र व मैत्रिणींना तिच्या हातच्या आळूच्या वड्या व गरम पुरणाची पोळी फार आवडते.



माणसाला माणसाने नाडू नये इथे। अनुभव आणि वार्धक्याला मान असावा इथे।


मला नेहमी वाटते या आजी व आजोबांना आमचा कधी कंटाळा येत नसेल? संसारातून मुक्त व्हावेसे त्यांना वाटत नसेल? सतत ते घरात असतात, सिमेंटच्या भिंतीत! घरात 'थँकलेस' जॉब करण्यात रममाण असतात.घरात माझे आई-बाबा सतत कामात असतात. आजी-आजोबांकडे लक्ष द्यायला कोणालाही वेळ नसतो, असे मला नेहमी जाणवते. पण शेवटी त्यांचे आणि माझे 'आतड्यांचे बांध' आहेत, 'मायेचे पाश'आहेत.

आज आई-बाबा सतत घराच्या बाहेर असतात. त्यामुळे आम्हाला घडवायचे काम आजी-आजोबाच करतात. आमची आवश्यक त्या सहवासाची भूक तेच भागवतात. आज घरात सगळेच थकून-भागून येतात. कोण-कोणाचे स्वागत करणार? विचारपूस करणार? तर हे काम आजी-आजोबाच करतात.

आज घरातील सगळी माणसं सतत बाहेर असतात आणि घरात असतात फक्त वस्तु. हे घर वस्तूंचे नसून माणसांचे आहे, हे पढवणारे माझे आजी-आजोबा माझे अगदी जीवश्च-कंठश्च आहेत.

म्हणून या युगात प्रत्येकाची गरज आहे **'आजी-आजोबा'**. असं असूनही घरोघरच्या आजी-आजोबांकडे पाहताना ते काहीसे असुरक्षित, अशांत व अस्वस्थ वाटतात. दोन पिढ्यांच्या वैचारिक मतभेदाचा विचार शांतपणे केला,

**दीपिका पवार,** इ. ९वी
रचना विद्यालय, नाशिक
(हस्तलिखित स्पर्धा ९८-९९)
**चित्रकर्ती - प्राजक्ता जगताप,** इ. ९वी





**पा**वसाळ्यात संध्याकाळच्यावेळी शेताच्या कडेला किंवा जंगलामध्ये लुकलुकणारे काजवे तुम्ही पाहिले असतील.काजव्यांना पाहून तुम्हाला खूप गंमत व आश्चर्यही वाटले असेल नाही का? तर अशा या चमकणाऱ्या काजव्याविषयीची माहिती फारच मनोरंजक आहे.काजव्यांना इंग्रजीत 'फायर फ्लाय' किंवा 'ग्लो वर्म'असे म्हणतात.

जिवंत प्राणी,कीटक किंवा झाडे यांच्यात प्रकाश निर्माण करण्याची क्षमता कशी काय असते? या जैविक उजेडाचे म्हणजेच बायोल्युमिनीसन्स विषयीचे कुतूहल काजवा बघणाऱ्यांना नेहमीच वाटे.अनेक वैज्ञानिकही या जैविक प्रकाशामागेच होते.त्याविषयी त्यांनी खूप प्रयोग,संशोधन केलेले आहे.उजेड निर्माण करण्यासाठी काजव्यांच्या शरीरात काही विशेष व्यवस्था असते काय? याविषयी खूप अभ्यास केला गेला.

काजव्यांच्या पंखांची केवळ उघडझाप होताना उजेडाची निर्मिती होते,अशी कित्येक दिवस कल्पना होती.परंतु १८८५ मध्ये फ्रेंच वैज्ञानिक डॉ. राफेल ड्युबॉइस यांनी ही कल्पना चुकीची आहे,असे प्रयोगाअंती सिद्ध केले.डॉ. ड्युबॉइस यांच्या म्हणण्याप्रमाणे काजव्यांच्या शरीर आवरणाखाली जैविक उजेड देणारा अवयव असतो. या अवयवांवर उजेड तयार करणाऱ्या पेशीचा थर असून याखाली उजेड परावर्तित करणाऱ्या पेशी असतात.

डॉ.ड्युबॉइस यांनी एका साध्या प्रयोगासाठी दोन काजवे घेतले.दोन्ही काजव्यांचे उजेड देणारे अवयव काढून घेतले व ते वेगळे वेगळे रगडून त्यांचा अर्क तयार केला.एका काजव्याचा अर्क साध्या पाण्यात व दुसऱ्याचा उकळत्या पाण्यात घातला.दोन्ही अवयवयांची उजेड देण्याची क्षमता संपल्यानंतर ते पाण्यातून बाहेर काढले.नंतर दोन्ही प्रकारचे पाणी डॉक्टरांनी एकत्र केले.तेव्हा पुन्हा उजेड दिसू लागला.अशा तऱ्हेने डॉ.ड्युबॉइस यांनी दाखवून दिले की,प्रकाश निर्माण करण्यासाठी काजव्याला विशिष्ट अवयव असतो.प्रकाशाची निर्मिती दोन रासायनिक पदार्थांनी होते.या दोन रासायनिक पदार्थांना 'ल्यूसिफेरिन' व 'ल्यूसिफेरज' असे नाव दिले.वरील प्रयोगात या दोन्हीपैकी एक पदार्थ उकळत्या पाण्याच्या उष्णतेमुळे अक्रिय होतो.या दोन रसायनामध्ये विशिष्ट ऑक्सिडीकरण होऊन उष्णताविरहित फिक्या रंगाची निर्मिती होते.अशा तऱ्हेने काजव्यांसंबंधी फार महत्त्वाची आणि वैज्ञानिक माहिती समजली.या जैविक उजेडाचा उपयोग हे कीटक एकमेकांशी निरनिराळ्या कारणांनी संबंध ठेवण्यासाठी करतात.




दिप्ती हाजिरनीस

**प्रत्येक नव्या दिवशी बातम्या ऐकताना भारत-पाक सीमेवरती नेमके काय घडते आहे; हे जाणायला आज प्रत्येक भारतीय नागरिक उत्सुक आहे. केवळ एक महिन्यापूर्वी, वातावरण शांत असताना जम्मूजवळील 'सचेलगड भारत-पाक सीमा' या स्थळाला भेट देणाऱ्या, दिप्ती हाजिरनीसने तेथे काय पाहिले, काय अनुभवले आणि तिच्या मनात कोणते भावतरंग उमटले, ते या लेखात मांडायचा प्रयत्न केला आहे. आजच्या स्फोटक राजकीय परिस्थितीमुळे तिच्या अनुभवाला केवळ 'प्रवासवर्णन' हे स्वरूप न राहता, वेगळाच संदर्भ प्राप्त झाला आहे.**

वार्षिक परीक्षा सुरू होताच सहलीचे वेध लागतात. यंदा 'भारताचे नंदनवन' म्हणून प्रसिद्ध असलेल्या जम्मू काश्मीरला जाण्याचे ठरले. काश्मीर म्हणताच बर्फाने नटलेल्या पर्वतराशी, शिकारे, फार-पाईनचे आकाशाला साद घालणारे उंच वृक्ष पाहायला, मन जसे आतुर होते,तसेच उत्तरेकडील 'भारत-पाक सीमा' पाहण्याचीही उत्सुकता होती आणि मन नकळत, कवीवर्य वसंत बापट यांची,

**'बर्फाचे तट पेटुनी उठले । सदन शिवाचे कोसळले ।।**
**रक्त आपुल्या प्रिय आईचे । शुभ्र हिमावर ओघळले ।'**

ही कविता गुणगुणु लागते.

सुदैवाने मला या सहलीत जम्मूपासून २५ मि.मी. अंतरावर असलेली 'सचेलगड भारत-पाक सीमा' पाहण्याचा योग आला. प्रवासात असताना, सीमा पाहण्याची उत्कंठा व त्याचबरोबर मनाच्या एका कोपऱ्यात थोडी भीती, यामुळे सीमेवर काय दिसेल? याबाबत उत्कंठामिश्रीत संभ्रम होता. या विचारचक्रात सीमा केव्हा आली ते कळलेच नाही.

सीमाद्वाराशी भारतीय जवानाने हसतमुखाने केलेले स्वागत पाहून आम्ही मनोमन सुखावलो. आत शिरताच विस्तीर्ण मैदान दिसले. मैदानात ठिकठिकाणी छोट्या भिंती उभारून त्यावर 'जोश, आजादी, धैर्य' अशी अनेक ध्येये लिहिलेली बघून मन उत्साहित झाले. मैदानात टेहळणी बुरुजावर 'तिरंगा' मोठ्या दिमाखात फडकत होता. तो फडकत राहण्यासाठी शीर तळहातावर घेऊन लढणाऱ्या जवानांपुढे मी नतमस्तक झाले. बुरुजावरून भारतीय लष्कर, आधुनिक दुर्बिणीने अहोरात्र टेहळणी करत असते. शत्रूच्या हल्ल्याला चोख उत्तर देण्यासाठी तोफा, बंदुका व त्यात वापरावयाचा दारुगोळा, काडतूस, असे सारे सज्ज होते. बाजूलाच जाड रेतीने भरलेली पोती होती. शत्रूच्या गोळ्या त्यात रुतून बसतात, त्यामुळे आपल्या लष्कराचे गोळ्यांच्या वर्षावापासून संरक्षण होते.


बुरुजापासून काही फुटावर एक डेरेदार पिंपळाचे झाड आहे. त्या झाडाचे बिजारोपण भारत-पाक फाळणीच्या वेळी झाले. जेव्हा त्याचा वृक्ष झाला तेव्हा त्याच्या मध्यावर एक वीट ठेवली, हीच ती 'भारत पाक सीमा'! त्याचे पान तोडायला देखील दोन्ही देशांची परवानगी घ्यावी लागते. निसर्गालाही मानवाने केलेली देशाची फाळणी मंजूर नाही, याचेच हे द्योतक नाही का?

झाडाजवळ दिवसातून दोनदा भारत-पाक सैनिक एकमेकांना भेटतात त्याला 'मिलाफ'म्हणतात. आम्ही जाण्याच्या आदल्या दिवशी पाक सैन्याने भारतीय लष्करावर ४ ते ५ फैरी झाडल्याने वातावरण थोडे तणावपूर्ण झाले होते व मिलाफच्या कार्यक्रमात खंड पडला होता. पिंपळ वृक्षापासून समोर काही फुटांवर पाकिस्तानचा टेहळणी बुरूज आहे. तेथे पाक सैन्याचा अहोरात्र पहारा असतो.

भारतीय बुरुजाच्या आवारातील भिंतीवर, ''संकटाचे वेळी देव अन् युद्धाचे वेळी सैनिकांची आठवण येते, मात्र संकट टळल्यावर देव विसरला जातो व सैनिकांकडे दुर्लक्ष होते.'' अशा आशयाचे एक वाक्य आहे. ते वाचून मन विषण्ण होते. खरंच का अशी भारतीयांची भावना असते? तशी असेल तर ते भारतीय कुठले? असे अनेक विचार मनात आले. वरील अनुभव सैनिकांना आलाही असेल, पण यातून 'गरज सरो, वैद्य मरो' ही वृत्ती दिसते. ही खंत जवानांच्या मनात असेल तर ती दूर करणे, हे प्रत्येक भारतीयाचे कर्तव्य आहे. तेव्हा देशासाठी घरादारावर तुळशीपत्र ठेवणाऱ्या सैनिकांसाठी नागरिकांच्या मनात सदैव आदर, आपुलकी व सहकार्याची भावना असू दे, हीच भारतमातेकडे प्रार्थना!! ▯

**दिप्ती हाजिरनीस**, इ. ८वी
'श्री गणेश' विद्या वर्धिनी, प्राध्यापक वसाहत, धुळे

तरीसुद्धा असं का? हा विचार मात्र अस्वस्थ करतो.



# धाडसी नंदू

**स्वप्नील कोरगांवकर**

सकाळची वेळ, किरणांनी न्हाऊ घालणारा सूर्य, प्रात:काळी पुष्पांचा अखंड अभिषेक करणारा पारिजात, फुललेल्या फुलांचा सुवास घेऊन येणारा वारा, गाईच्या गळ्यातील वाजणाऱ्या घुंगरांची किणकिण, या सर्व गोष्टींचा अनुभव मला त्याच दिवशी आला. कारण अगदी भल्या पहाटे उठण्याचा माझा तो पहिला दिवस होता.

रविवार म्हणजे सुट्टीचा वार, अर्थात थोडं उशिरापर्यंत लोळत पडण्याचा दिवस होय. पण त्या रविवारी पूर्वनियोजित नदीकाठचे वनभोजन असल्यामुळे रात्रभर निवांत झोप लागलीच नाही. रात्री झोपेत जवळ-जवळ सर्व दृश्ये डोळ्यांसमोर तरळत होती. नदीकाठ, नदीकाठी उंच असणारे वडाचे झाड, मी तर या झाडाच्या पारंब्यावर झोके घेऊ लागलो होतो.

शेवटी तो दिवस उजाडला. सूर्य देवाच्या आगमनापूर्वीच आम्ही सर्व तयारीनिशी एकत्र जमतो. वनभोजनाच्या निमित्ताने फिरणे, खेळणे, झाडांवर चढणे, यांचा आनंद घेता येणार होता, म्हणून आम्ही सर्वजण खुशीत होतो. यासाठी खेळाच्या साहित्याची तयारी आम्ही आदल्याच दिवशी केली होती. कोणी फुटबॉल तर कोणी हँडबॉल, व्हॉलीबॉल तर कोणी क्रिकेटचे बॅट, बॉल, स्टंप आणायचे हे निश्चित केले होते.माझ्या आईने आदल्या दिवशीच कपड्यांना इस्त्री करण्यापासून डब्यात काय घ्यायचे, इथपर्यंत सर्व गोष्टींची तयारी केली होती. सर्व मुलांना आपल्या आवडीची फुलपँट व शर्ट वापरण्याची ती एक संधी होती व शाळेच्या गणवेशातून एक दिवस मुक्ती होती. थोडक्यात थोरामोठ्यांसारखे मिरवण्याचा तो दिवस होता.

वाटेत जाता जाता रस्त्यात आमच्या वानरसेनेचे उपद्रव सुरूच होते. हातात 'डेळकी' होतीच. अर्थात वाटेत दिसणारे फळ किंवा एखादे उडणारे पाखरू,डेळकीत दगड घालून टिपण्याचे प्रयत्न करणे, अशा मौजमस्तीत आम्ही वाटा तुडवत नदीपर्यंत येऊन पोहोचलो. सकाळचे नऊ वाजून गेले होते. हळूहळू सूर्यदेव आपली किमया दाखवायला लागला होता. हवंहवंस वाटणारं ऊन हळूहळू चटके देऊ लागले होते.आम्ही झाडाच्या सावलीत थोडा वेळ विसावलो. नंतर त्याच झाडाच्या सान्निध्यात विविध खेळांना सुरुवात झाली.

कोणी क्रिकेट तर कोणी फुटबॉल तर कोणी रॅकेट घेऊन बॅडमिंटन खेळत होते. सर्वजण आरडाओरडा करून खेळत होते. हळूहळू पोटपूजा करण्याची वेळ जवळ येऊ लागली. बारा वाजत आले, तसतसा एक एक गट झाडाखाली जमू लागला. आता सर्वांचे लक्ष आणलेल्या खाऊच्या डब्याकडे लागले होते. काही जण अजून खेळात होते. आरडाओरडा सुरूच होता. एवढ्यात नदीच्या दिशेने,''वाचवा! वाचवा! मेलो! मेलो'' हे शब्द कानावर पडताच

आमच्च्या सर्वांच्या नजरा तिकडे वळल्या.आम्ही सर्वजण खेळ टाकून नदीकाठी धावतच गेलो.

आमच्या डोळ्यांदेखत दीपक पाण्यात गटांगळ्या खात होता. दुपारचे १२ वाजले होते. नदीला भरती होती. दीपक जेवणाची वेळ झाली म्हणून हातपाय धुण्यास नदीवर गेला होता. त्याचा पाय निसटला व नदीच्या प्रवाहाबरोबर खाली ओढला जाऊ लागला. आमच्यापैकी सर्वांना पोहता येत होते. परंतु नदीत उडी मारण्याचा धीर कोणालाही झाला नाही.सर्वजण मदतीसाठी हाका मारत होते. काही जण देवाची प्रार्थना करीत होते. पण एवढ्यात,धप्पऽऽ असा आवाज झाला. सर्वांच्या नजरा पाण्याकडे वळल्या. सर्वांनी नदीकडे पाहिले, तर आमच्यातीलच एका 'नंदू' नावाच्या मुलाने पाण्यात उडी मारली होती. दीपकचे केस कसेबसे पकडून नंदूने ओढत ओढत त्याला काठापर्यंत आणले. शाळेत आम्हाला पोटातील पाणी काढायचे शिकवले होते. तसे प्रयोग, सुरेश व महेशने केले आणि त्याच्या पोटातील पाणी काढले. हळूहळू दीपक शुद्धीवर आला. त्याला थर्मासमधून आणलेली थोडी कॉफी दिली. त्याला थोडीशी हुशारी वाटू लागली. मग आम्ही पुन्हा सर्वजण झाडाखाली एकत्र झालो. आम्हा सर्वांच्या पोटात कावळे ओरडू लागले होते. परंतु कोणाचेही जेवणाकडे लक्ष नव्हते. राहून राहून दीपकवर ओढवलेल्या प्रसंगाची आठवण येत होती. परंतु पुढे दोन मैल चालून जायचे होते. त्यासाठी शरीरात शक्ती येणे आवश्यक होते व त्यासाठी पोटपूजा आवश्यक होती. याचे भान ठेवून डबा खाण्याचे उरकले व ताबडतोब घरी परतीच्या वाटेला लागले. सकाळच्या आनंदावर थोडे विरजण पडले होते. सर्वांची मने खिन्न होती. प्रत्येक जण कष्टी मनाने घरी परतत होता. मी मात्र दीपकसाठी काहीच धाडस दाखवू शकलो नाही, म्हणून मनातल्या मनात खजील झालो होतो.

गावात आल्यावर सर्वांच्या कानावर ही बातमी पोहोचली.गावात सरपंचांच्या उपस्थितीत ग्रामपंचायतीमार्फत, नंदूचा सत्कार करण्यात आला. हळूहळू ही बातमी सरकार दरबारी पोहोचली. सर्व वर्तमानपत्रांतून नंदूचे कौतुक करण्यात आले. राष्ट्रपतींच्या हस्ते नंदूचा गौरव करण्यात आला व बक्षीस प्रदान करण्यात आले.

ज्या ज्या वेळी 'नंदू'च्या धाडसाची मला आठवण येते, त्या त्या वेळी मला त्याचा अभिमान वाटतो व माझ्या भित्रेपणाची तितकीच लाज वाटते.

**स्वप्नील कोरगावकर**
गोवेकर चाळ, मु.पो.मडुरा,
ता.सावंतवाडी,जि. सिंधुदुर्ग
**चित्रकर्ती – वैदेही पंडीत,** इ. ८वी

## करून तर पाहा
# लूप ग्लायडर



**साहित्य :** कागद, कात्री, पट्टी, पेन्सिल, स्ट्रॉ, चिकटपट्टी इत्यादी.

कृती :

१) २ सें.मी. १६ सें.मी.ची एक कागदाची पट्टी कापा.
२) २ सें.मी. १० सें.मी.ची कागदाची दुसरी पट्टी कापा.
३) १५ सें.मी.चा स्ट्रॉचा तुकडा कापा.
४) छोट्या पट्टीस वर्तुळाकार आकार देऊन त्या पट्टीची टोके एकावर एक व्यवस्थित बसवा व चिकटवा. त्याचप्रमाणे मोठ्या पट्टीचेही वर्तुळ तयार करा.
५) आता चिकटपट्टीने ही दोन्ही वर्तुळे स्ट्रॉच्या दोन्ही टोकाला एक/एक याप्रमाणे चिकटवा. तुमचे ग्लायडर तयार झाले.
६) स्ट्रॉ सरळ आडवा धरा. छोटे छोटे वर्तुळ पुढे तर मागे मोठे वर्तुळ अशा स्थितीत स्ट्रॉ धरा.
७) 'लूप ग्लायडर' हलकेच पुढे फेका.
८) ते वेगाने पुढे जाईल आणि मग हळूहळू खाली उतरेल.

**कुणाल वेलणकर,** इ. ८वी,
टिळकनगर विद्यामंदित, डोंबिवली,(हस्तलिखित स्पर्धा ९८-९९)

# फुलाचे आत्मकथन

हिरव्यागार गालिच्याप्रमाणे वाटणाऱ्या त्या बागेतल्या प्रसन्न हिरवळीत, वृक्षांच्या दाट झाडीत, सकाळच्या कोवळ्या किरणांचे तेज अंगावर घेत आम्ही तिघे भाऊ जन्माला आलो होतो.सार कसं प्रसन्न प्रसन्न! एकाच वेलीवर असूनसुद्धा आमच्या रूपात, रंगात किती अफाट बदल! ही सर्व हुशारी या आधुनिक माळ्याचीच बरं का! मी पांढरा, माझं एक भावंडं पिवळं आणि दुसरं लाल. तिघांनाही आपापला रंग आवडत होता. घनदाट पण पसरलेल्या त्या माझ्या पाकळ्या पाहून मला माझ्या सौंदर्याचा गर्व चढत चालला होता. परंतु मोगरा मला गर्वाचा भार वाहू नकोस असे म्हणत होता.

एका शुभ्र व मनमोकळ्या सकाळी तो माळी कात्री घेऊन आला. त्याने ती का आणली असावी याचा मी विचार करू लागलो. माळ्यानी आम्हाला पाणी घातले आणि आमच्या देठालाच पकडले. पुढे काय घडणार याची उत्सुकता असतानाच मी बेशुद्ध पडलो. शुद्धीवर आलो तेव्हा कळलं की आम्ही एका फुलांच्या टोपलीत असून आमची बाजारात विक्रीला नेण्यासाठी मांडामांड चालू होती. मला व माझ्या भावांना नीटशी हालचालच करता येत नव्हती. कारण आम्हाला देठापासून कात्रीने कापले होते. प्रथम डोळे उघडले तेव्हा समोरच्या दुकानाची पाटी वाचली.‘प्रभात फूल सेंटर!’ आम्हा तिघा भावांचे हास्य बघून सारी फुले आम्हाला वेडी म्हणू लागली. आम्हाला थोडे फार इंग्रजी समजत होते,तेव्हा त्या पाटीचा अर्थ निघत होता,‘सकाळचे मूर्ख ठिकाण!’

ते ऐकून त्या दुकानातील बकुळीने नाराजीने पाठच फिरवली. गुलाब अबोल झाला. इंग्रजी जाणत नसल्यामुळे त्यांना ‘मूर्ख’ म्हटल्याचा राग आला होता. यात माझाही काही दोष नव्हता.

तितक्यांत तिथे एक अत्यंत सुंदर जोडपे आले. काय त्या स्त्रीचे सौंदर्य आणि काय तिचे ते लांबसडक केस! माझ्यासकट सर्वांना त्या स्त्रीच्या केसात माळून घेण्याची उत्कट इच्छा झाली. पण त्या घमेंडी नवरोबाने त्या पिवळ्या फुलाची निवड केली.


काही वेळाने तेथे एक आजी आली. हातातील पूजेचे साहित्य बघून वाटलं, की ही देवळात जाणार. देवाच्या पायाशी पडून राहण्याचे भाग्य आम्हा सर्वांनाच हवे होते. आम्ही सर्वजण आपल्यालाच निवडावे, या हेतूने माना वर करत होतो. पण कसचं काय? त्या आजीने तर लाल फुलाची निवड केली. आता माझ्या भावंडांपैकी एक त्या सुंदर स्त्रीच्या केसात होते, तर दुसरे देवाच्या पायाशी पोचले होते.


नंतर संध्याकाळपर्यंत कोणीही गिऱ्हाईक आले नाही, त्यामुळे मालकाने दुकान बंद केले आणि दुसऱ्या दिवशी सकाळी दुकान उघडल्यावर, त्यांनी आम्हाला रस्त्यावर उकिरड्यावर फेकून दिले. बकुळी आपल्या इतस्ततः विखुरलेल्या अवयवांमुळे रडत होती, तर आतून पूर्णपणे उखडून निघालेला झेंडू मात्र, खोटे अवसान आणून तिचे सांत्वन करत होता.

इतक्यात कोणीतरी मला उचलले. त्याचा कोमल स्पर्श मला पुन्हा जीवन जगण्याची प्रेरणा देत होता. त्या मुलाचा घामेजलेला हात माझ्या पाकळ्या ओल्या करत होता. तो कुठेतरी निघाला होता.आणि मलाही घेऊन जात होता. जाता-जाता रस्त्यात असलेल्या कचराकुंडीत मला माझ्या भावाची आर्त हाक ऐकू आली. हो, कालच त्या सुंदर स्त्रीने माळलेले पिवळे फूल होते ते! त्यानंतर देऊळ लागले. त्या मंदिराच्या मागे कालच्या शिळ्या फुलांचा ढीग ओतला होता. माझा दुसरा लाल रंगाचा बंधूही तेथेच असेल कदाचित्!

मुलगा निघाला होता स्माशानभूमीत! त्याच्या मित्राच्या आईची चिता तेथे होती. त्याने मला तिच्यावर वाहिले. चिता पेटली आणि आता... आता मी त्या चितेबरोबर अनंतात पूर्णपणे विलीन होत आहे... ▯

**किरण मार्के, इ. १०वी**
सरस्वती मंदिर,कल्याण,ठाणे.
‘सुगंध’(हस्तलिखित स्पर्धा ९८-९९)
**चित्रकर्ती – नीरजा दशपुत्रे**, इ. ८वी





# पेटंट

**मधुरा पोफळे / कल्याणी देव**

**ह्या** वर्षाची सुरुवात मजेत होत असतानाच, अचानक 'भारत पेटंट विषयक कायदा करतो आहे' ही बातमी वर्तमानपत्रातून जाहीर झाली. सर्वसामान्यांप्रमाणे ही बातमी आली तशीच मुरली, कारण पुरेशी माहिती नसल्याने कायदा काय आहे? हे समजणं फारच अवघड होतं. पेटंट विषयक प्राथमिक माहिती सर्वांना व्हावी या उद्देशाने हा लेख लिहीत आहोत.

आजचे वैज्ञानिक शोध बघता एखाद्या समस्येवर तोडगा काढणे..त्यासाठी नवी रचना..नवी प्रक्रिया..नवे उत्पादन.. नवा शोध..असे माणसाने विज्ञानाचे आव्हानच घेतले आहे. अर्थातच ह्या अविश्वसनीय जगात, अशा नवनिर्मितीला संरक्षण मिळावे, त्याची कोणी नक्कल करू नये, यासाठी संशोधिलेल्या वस्तूचे, रचनेचे, प्रक्रियेचे रक्षण होण्यासाठी सरकारची गरज होती. या सगळ्याला मग सरकारने कायदेशीर संरक्षण दिले. त्याला स्वामित्वाचे हक्क(ओनरशीप राईट्स) म्हणतात. कायदेशीर संरक्षण मिळालेल्या संशोधनांचे बुद्धिसंपदेत (इंटलेक्चुअल प्रॉपर्टी)रूपांतर होते. 'संशोधनासाठी मिळालेले पेटंट, व्यापार चिन्ह (ट्रेडमार्क) यासाठी मिळालेले रजिस्ट्रेशन डिझाईन अथवा कॉपीराईट रजिस्ट्रेशन हक्क संरक्षण' हे सर्व 'बुद्धिसंपदा' म्हणून ओळखले जातात.

पेटंट : पेटंट किंवा एकस्व हा भारत सरकारच्या पेटंट ऑफिसने नवसंशोधित वस्तूसाठी, प्रक्रियेसाठी, संशोधनासाठी दिलेला परवाना. पेटंट हे नवीन शोधासाठी मिळते. एखादे उत्पादन, प्रक्रिया (प्रोसेस) जी नवीन आहे, कोठेही पूर्वज्ञात नाही, ती संकल्पना पूर्वप्रसिद्ध केलेली नाही, त्या शोधाचे जाहीर प्रकटीकरण झालेले नाही, त्याची विक्री झालेली नाही, अशा वेळीच त्या संशोधनाला शोध (इन्व्हेन्शन) असे संबोधले जाते. पेटंट काशाचे आहे, हे कोणालाही पाहता येते, परंतु त्याचा वापर उत्पादनात केला, तर त्याचे स्वामित्व शुल्क (रॉयल्टी) द्यावे लागते.

एखादी नवीन पद्धत, नवी संकल्पना ज्याचे रूपांतर विक्रीयोग्य, उपयुक्त अशा उत्पादनात होऊ शकते, अशा वस्तूस अथवा प्रक्रियेस पेटंट मिळते. एखादी वस्तू, यंत्र, उपकरण पद्धती आदीच ज्ञात आहे, पण त्यामध्ये काही अंशी अथवा भरपूर सुधारणा करून ती वस्तू, यंत्र अधिक सुटसुटीत, अधिक सोयींनी युक्त, उत्पादन जास्त कार्यक्षमतेने करू शकले तर अशाही वस्तूमधील संशोधित भागात सुधारणा केल्या म्हणून पेटंट मिळू शकते. दोन अथवा अधिक ज्ञात तंत्रज्ञानाच्या साहाय्याने एक वेगळीच निर्मिती केली की जी पूर्वी ठाऊक नव्हती, तर अशा सरमिसळ करून बनविलेल्या वस्तूस पेटंट मिळते. परंतु इथे एक गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे,की दोन अथवा अधिक तंत्रे अथवा ज्ञात यंत्रे, सयंत्रे जी स्वतंत्रपणे अस्तित्त्वात आहेत, काम करत आहेत, तरीही त्यांच्या नावीन्यपूर्ण जोडणीमुळे एक नवेच यंत्रतंत्र वगैरे निर्माण झाले, तर त्याला निश्चित पेटंट मिळू शकेल.


परंतु अस्तित्वात असलेल्या यंत्राचा, नाविन्यपूर्ण शोध नसल्यास पेटंट मिळत नाही.उदाहरणार्थ ट्रॅक्टरचा उपयोग शेतात नांगरणी, मशागतीच्या कामासाठी होतो, पण त्या ट्रॅक्टरच्या साहाय्याने ज्वारीची मळणी केली. तर तो शोध ठरत नाही आणि पेटंट मिळत नाही. प्रत्यक्ष औषधाला पेटंट मिळत नाही, मात्र ते तयार करण्याच्या प्रक्रियेस पेटंट मिळते. माहीत असलेल्या वनस्पती,त्यांचे भाग,त्यांचे विविध गुणधर्म,उपयोग यांना पेटंट मिळत नाही.अणुशक्ती संबंधी केलेल्या संशोधनास, तंत्रज्ञानास पेटंट मिळत नाही.कॉम्प्युटर सॉफ्टवेअर हा लेखनाचा प्रकार समजला जातो म्हणून त्यासही पेटंट मिळत नाही. (त्यासाठी कॉपीराईटची सोय उपलब्ध आहे.)

सर्व पेटंटचे अर्ज 'पेटंट कार्यालय'इथे सर्वांना बघण्यासाठी उपलब्ध असतात. पेटंट हे ठराविक कालावधीसाठी दिले जाते. तो कालावधी सर्वसाधारणपणे १४-१७ वर्षे इतका आहे.परंतु खाद्यपदार्थ किंवा औषधे यांच्याबाबतीत मात्र तो ५-७ वर्षे इतकाच आहे. पेटंट मिळवण्यासाठी त्या शोधाची माहिती सर्वप्रथम पेटंट ऑफिसला अर्जासोबत वर्णन करून कळवणे बंधनकारक असते.

**मधुरा पोफळे, कल्याणी देव,** इ. ९वी २४, वर्षानंद सोसा.आनंदनगर, सिंहगड रोड, पुणे ४११ ०५१
**चित्रकर्ती – नीरजा दशपुत्रे,** इ. ८वी

# विजयदुर्ग किल्ल्याचा इतिहास

अश्विनी जाधव



विजयदुर्गचा इतिहास सांगायचा म्हटला तर शब्द अपुरे पडतील;असाच इतिहास या किल्ल्याला आहे. या किल्ल्याचे मूळनाव मात्र 'घेरीया' असे होते. शिलाहार राजाच्या कारकिर्दीत म्हणजे सन ११९३ ते १२०६ या कालावधीत तो बांधला होता असा इतिहासकारांचा अंदाज आहे. कोल्हापूर पन्हाळे येथे त्यावेळी शिलाहार घराण्याचा भोज राजा राज्य करीत होता. असामान्य अशा या पराक्रमी राजाने कोकण प्रांतावर आपले वर्चस्व प्रस्थापित केले होते. त्याचा रिसालदार अली बेग हा कोकण प्रांताचा कारभार सांभाळीत होता. त्यांच्या देखरेखीखाली भोज राजाने एकंदर सोळा किल्ले बांधले व काहींची डागडुजी केली. त्यात विजयदुर्ग किल्ल्याचा समावेश होता. सन १२०० मध्ये तो बांधला गेला असावा असा इतिहासकारांचा अंदाज आहे.

विजयदुर्गवर अनेक राज्यकर्त्यांनी आपले अधिपत्य गाजवले. १४९० ते १५२६ या कालावधीत बहामनी राज्याचे पाच तुकडे झाले. त्यात विजापूरच्या आदिलशहाकडे कोकण प्रांत सोपवला गेला. त्यानंतर १६५३ पर्यंत सुमारे १२९ वर्षे विजयदुर्ग किल्ला विजापूरकरांच्या अंमलाखाली राहिला. छत्रपती शिवाजी महाराजांनी १६५३ साली विजयदुर्ग किल्ला विजापूरच्या आदिलशाहाकडून जिंकून घेतला. त्यावेळेपासून विजयदुर्ग किल्ल्याचा सुवर्णकाल चालू झाला.स्वत: शिवाजी महाराजांनी निशाण टेकडीवर स्वहस्ते भगवा ध्वज फडकविला आणि दोनशे वर्षे मुसलमानी अंमलाखाली असणारा विजयदुर्ग किल्ला मराठ्यांच्या ताब्यात आला.किल्ला सर करताना महाराजांना फारसा प्रतिकार झाला नाही. त्यावेळी कोकणच्या उत्तर भागात महाराजांनी अवघ्या सहा-सात महिन्यात, पराक्रमाने अक्षरश: तुफान उडवून दिले. एवढे क्रूर व चिवट फिरंगी अन् सिद्दी, पण तेही घाबरून गेले. महाराजांनी विजयदुर्गवर स्वारी करताच किल्लेदाराने शरणागती पत्करली व किल्ला मराठ्यांच्या ताब्यात दिला.

शिवाजी महाराजांनी हा किल्ला जिंकून घेतला तेव्हा त्याची व्याप्ती फारशी नव्हती. साधारण ५ एकर क्षेत्रात हा किल्ला विखुरलेला होता. पण आता मात्र किल्ल्याचे क्षेत्र १४ एकर १५ गुंठे इतके झाले. महाराजांना विजयदुर्ग या ठिकाणी आपले आरमारी केंद्र स्थापन करावयाचे असल्याने त्यांनी किल्ल्याची दुरुस्ती केली व व्याप्ती पण वाढविली. पूर्वेच्या बाजूला नवीन तटबंदी भारण्यात आली व त्यावर शत्रूवर मारा करण्यासाठी बुरुजांची रांग उभारण्यात आली, याला चिलखती तटबंदी असे संबोधण्यात

येते. किल्ल्याच्या आतील भागात हत्ती, घोडे यांच्या पागा, पिण्याच्या पाण्याचे तलाव, धार्मिक भावनांचा आदर करून भवानी मातेचे मंदिर यासारख्या वास्तू निर्माण करण्यात आल्या. आता हे मंदिर आपण किल्ल्यावर गेल्यावर पाहिलंत तर मंदिराची परस्थिती पाहून हे मंदिर आहे का? असाच प्रश्न आपल्याला पडेल.

विजयदुर्गपासून ६ कि.मी. अंतरावर असणाऱ्या गिर्ये या गावावरून या किल्ल्याला 'घेरिया' हे नाव पडले. पण महाराजांनी किल्ल्याची दुरुस्ती केली तेव्हा 'विजय संवत्सर' चालू होते. विजयसंवत्सरात किल्ल्याचा कायापालट केला म्हणून त्याचे नाव 'विजयदुर्ग' ठेवण्यात आले.

इ.सन १६५३ साली शिवाजी महाराजांनी किल्ला जिंकल्यानंतर प्रवेश द्वारानजिक हनुमान मंदिर बांधलेले आहे. मंदिरासमोरून पुढे गेल्यावर, मुख्य दरवाजाला संरक्षण देणारा जिबीचा दरवाजा दिसतो. जिबीत्वा म्हणजे आघाडीचा दरवाजा होय. पुढे गेल्यावर आपल्याला ३०मीटर उंचीचा दटबंदी दिसते. या तटावर अनेक ठिकाणी काही बुजविलेले खड्डे दिसतात.ती आहे लढाईत किल्ल्याला झालेल्या, जखमांवर केलेली मलमपट्टी, इंग्रज, डच व पोर्तुगीज या परकीय शत्रूंनी किल्ल्यावर ज्या स्वाऱ्या केल्या त्यावेळी त्यांनी केलेल्या तोफांच्या माऱ्याच्या त्या खुणा आहेत. काहीसा वळसा घेऊन किल्ल्याचे प्रवेशद्वार बांधलेले आहे. अशा प्रकारच्या बांधणीला 'गोमुख बांधणी' असे म्हणतात.१०-१२ पायऱ्या चढून वर गेल्यानंतर आपणास एक महाकाय प्रवेशद्वार दिसते. आता ते बरेचसे ढासळलेले आहे. या दरवाजाला आत एक दिंडी दरवाजा होता. डाव्या बाजूला खलबतखाना नावाची इमारत दिसेल. महाराजांच्या काळात ज्या गुप्त बैठकी होत त्या या इमारतीतच. खलबतखान्यासमोर दिसणाऱ्या पायऱ्या चढून वर आपण ध्वजस्तंभाकडे जातो. आजही १५ऑगस्ट, २६जानेवारी रोजी या स्तंभावर तिरंगा फडकविला जातो. परत खाली उतरल्यावर समोरच 'सदर' नावाची पाटी दिसेल, त्या इमारतीत सभा व इतर बैठकी घेतल्या जात. समोर दारुगोळ्याचे कोठार आहे. पूर्वी दारुगोळा या ठिकाणी साठवला जात असे.बाजूलाच आपणाला 'भुयार' अशी पाटी दिसेल.अगदी समुद्रकिनारी असणाऱ्या 'खुशलठा तोफ बारा' या बुरुजाकडे जाण्याचा मार्ग याच भुयारातून आहे. पर्यटकांना या भुयारात प्रवेश करण्यास काहीच हरकत नाही. भुयारात पुरातन तोफगोळे पडलेले दिसतात. भुयाराच्या बाजूने तटावर जाण्यासाठी पायऱ्या आहेत. तेथून तटावर चढा व सरळ तटावरून चालू लागा. तटावरून चालताना तुम्हाला तटात थोड्या थोड्या अंतरावर वेगवेगळ्या कोनांवर काही झरोके दिसतील त्यांना 'जंगी' म्हणतात. जंगीचा कोन जितका तीव्र तितकी मारगिरी कमी. म्हणजे तटाच्या जवळ कोन जितका सरळ तितकी मारगिरी लांब अशी ही एकंदर योजना आहे.

तटावरून चालताना बारकाईने पाहिल्यास तटाखाली कोठारे आहेत. थोडे अंतर चालून गेल्यानंतर आपण 'लाईट हाऊस' जवळ जातो. इंग्रजांच्या ताब्यात किल्ला असताना केव्हा तरी हे बांधलेले आहे.आजपर्यंत ते चालू आहे. जहाजांना मार्गदर्शन करणे व बंदरात येणाऱ्या जहाजांची पाण्याची खोली ठरविणे हे त्याचे काम आहे. लाईट हाऊसच्या पुढे तटाच्या खाली एक चुन्याचा घाणा दिसतो. यावेळी सिमेंट नव्हते. चुना, रेती, गूळ, हरड्याचे पाणी व नारळाचा काथ्या घाण्यात घालून एकजीव केलेले मिश्रण वापरण्यात येई. आठशे वर्षे झाली तरी त्यावेळी वापरलेली मिश्रण अभेद्य आहेत. चुन्याच्या घाण्याच्या बाजूला गोड्या पाण्याची विहीर आहे. बाजूला २० फुटावर तट फुटलेला असून तेथे खारे पाणी आहे. समुद्रपातळी इतकीच गोड पाण्याची पातळी आहे.हा एक चमत्कार म्हणावा लागेल. जवळच पडके असे तीन चबुतरे दिसतील. हेच साहेबाचे ओटे. सन १८९८ साली एक खग्रास सूर्यग्रहण झाले होते. पृथ्वी व सूर्य यातील कमीत कमी अंतर असणारी ती जागा होती. त्या ग्रहणाचा वेध घेण्यासाठी अमेरिकन शास्त्रज्ञ जैनसन व लॅकीअर यांनी आपल्या दुर्बिणी त्या ठिकाणी ठेवल्या होत्या. निरीक्षण करताना त्यांना सूर्याभोवती पिवळ्या रंगाचे एक कडे दिसले. त्यावेळी ते काय आहे हे समजले नव्हते, पण आता तो 'हेलियम गॅस' असल्याचे माहीत झाले.

 **भ्रमंतीतून मिळते आरोग्य त्याहून मिळतो आनंद खरा। मिळवायला हा आनंद घाला पालथे डोंगर दरा।**

हेलियम गॅसचा शोध विजयदुर्ग किल्ल्यावर लागला म्हणूनच या ठिकाणाला हेलियम गॅसचे पाळणाघर असे संबोधतात. पुढे चालताना डाव्या बाजूला भग्न इमारतीचे अवशेष दिसतात. पूर्वी तिथे राजवाडे, सैनिकांची घरे व मंदिरे होती. नजीकच एक चौथरा आहे. तेथे पूर्वी भवानी मातेचे मंदिर होते. तेथील मूर्ती वेगळ्या ठिकाणी पडलेली होती. काही दिवसांपूर्वी, गावकऱ्यांनी मूर्ती मूळ जागेवर आणून, तिची विधीपूर्वक प्राणप्रतिष्ठा केली आहे. संपूर्ण किल्ल्याचा इतिहास समजून घेणे व ती ठिकाणे पाहणे यासाठी किमान पाच-सहा तासांचा अवधी लागतो.

किल्ल्यासारख्या इतिहासकालीन वास्तूकडे कुणाचे लक्ष नसल्याने किल्ल्याची अवस्था फारच बिकट झालेली दिसून येते. काळ बदलला तसे नवे रूप या प्रदेशाला आले आहे. खाडीत आरमारी नौकेऐवजी मासेमारी नौका फिरू लागल्या. किल्ल्यावर गुरे ढोरे चरण्यासाठी येऊ लागली आहेत. तट ढासळू लागले आहेत. सर्वात कहर म्हणजे ज्या बुरुजांनी शत्रूंना आपले सामर्थ्य दाखवले त्याच बुरुजांवर आता चढून येणारे पर्यटक आपली अचकट -विचकट नावे कोरू लागली आहेत. गडावर पाण्याची सोय नाही. मोडकळीस आलेले भव्य प्रवेशद्वार, किल्ल्याची स्थिती अत्यंत हलाखीची असल्याची जाणीव करून देते.

किल्ल्यावरील अनेक इतिहासकालीन वस्तू, औरंगाबाद येथील वस्तूसंग्रहालयात ठेवण्यात आल्या आहेत. त्यामध्ये तलवारी, छत्रचामरे, छोट्या तोफा, तोफगोळे, शिसे अशा अनेक वस्तू आहेत. तसेच या किल्ल्यावर पाण्याचा एक मोठा हौद होता. या हौदात पाण्याचा साठा पूर्वी होत असे, पण या हौदाच्या तळाकडील शिशाचे पत्रे काढून औरंगाबाद येथे नेण्यात आल्याने आता पाण्याचा साठा या हौदात होत नाही. त्यामुळे तेथे येणाऱ्या पर्यटकांचे पाण्याविना हाल होत आहेत. तसेच किल्ल्यावरील गोदामाच्या इमारतीवर शासनाने विश्रामगृह बांधले, पण पाण्याची सोय नसल्याने ते बंद करण्यात आले. आता मात्र विश्रामगृहाची संपूर्ण इमारत मोडकळीस आलेली आहे.

हे सर्व काही असले तरी देवगड तालुक्यातील हा इतिहासकालीन सुंदर किल्ला पहायला तुम्ही नक्की याच. ▯

**कु. अश्विनी जाधव**
मु.पो. वाडे मुळबांध
ता. देवगड, जि. सिंधुदुर्ग ४६६५०८.
**चित्रकार – प्रयाग सेठिया,** इ. ६वी

# माझी जगावेगळी मैत्रीण

**मी** शिशुवर्गात दाखल झाले व तिची आणि माझी मैत्री जमली. आता तिची व माझी गट्टी अजून बरेच वर्षे टिकणार याबद्दल शंकाच नाही.

पण ती मला नेहमी भेटत नाही. अखेरीस फक्त चार वेळा तिची आणि माझी भेट होते. दिवाळी अगोदर व मार्च वर्षातून तिचा मुक्काम बराच लांबतो. ती येणार असे समजल्यावर मला थोडीशी धडकीच भरते! पण माझ्यापेक्षा आईवडिलांना जास्त! आणि एकदा ती दाखल झाली की आमच्या घरचे वातावरण एकदम बदलते. मग घरातील टी.व्ही.अजिबात सुरू होत नाही. सकाळी लवकर उठावे लागते. चहा, न्याहारी, जेवण सर्व काही अगदी बसल्या जागेवर मिळते. एरवी लहान-सहान गोष्टींवरून चिडणारी आई एकदम शांत असते. तिचे स्वागत करण्यास किंवा तिची उठबस चांगल्याप्रकारे करण्यास मला कठोर परिश्रम करावे लागतात, अग्निदिव्य केल्यासारखे.

परंतु तिच्यामुळेच माझी प्रगती होते.मी यशाची एक-एक पायरी चढू शकते. काही दिवसांनी तिचा जाण्याचा दिवस येतो. वाईट वाटण्याऐवजी मी मनातून थोडीफार सुखावते. ती जाते, पुन्हा दोन-तीन महिन्यांनी भेटण्यासाठी. ती गेल्यावर काही दिवसांनी तिच्या स्वागतासाठी केलेल्या परिश्रमांचे फळ मिळते व घरांत सर्वत्र आनंदी पसरतो. पुन्हा तिच्या स्वागताची तयारी करण्यास प्रारंभ होतो.

अशा माझ्या जगावेगळ्या मैत्रिणीचे नाव तुम्हाला समजले असेलच. काही समजले? तिचे नाव आहे...परीक्षा!

प्रेरणा बनकर, इ. ६वी, विद्याभवन, गिरगांव,मुंबई.'प्रतिबिंब'(हस्तलिखित स्पर्धा ९८-९९)

# ऊतू नका मातू नका

**'छा**त्र प्रबोधन'च्या संपादकांनी त्यांच्या एका 'संवाद'मध्ये म्हटलेले, 'खाण्यायोग्य टाकणे, हा गुन्हा नाहीतर काय?' हे वाक्य मला अतिशय पटले; कारण अगदी लहानपणापासून माझ्यावर असेच संस्कार झालेत ना! मला माझ्या लहानपणीचा प्रसंग आठवतो. मी सहा-सात वर्षांची असेन. एका प्रसिद्ध स्वातंत्र्य-सैनिकाच्या नातवाच्या स्वागत समारंभाला आम्ही गेलो होतो. स्वेच्छाभोजन (बुफे) पद्धतीचे जेवण होते. मी मला पाहिजे त्याप्रमाणे एकेक पदार्थ आणून खात होते. माझ्या शेजारी बसलेले एक गृहस्थ हात धुवायला उठले. तेव्हा त्यांचे ताट बघून, मी झटकन माझ्या वडिलांना म्हणाले, ''बापू, यांनी ताटात किती टाकलंय? आपण किती खाणार, ते यांना कळत नव्हतं का?'' माझा आवाज ऐकून ते गृहस्थ आणि त्यांचे मित्रही चपापले.

असाच आणखीही एक प्रसंग मला आठवतो. माझी आतेबहीण चेतू आमच्याकडे आली होती. अगदी स्वच्छ ताट पाहून ती वडिलांना म्हणाली, ''मामा, मीठ राहिलं की तसंच'' तेव्हा-पासून मी पाहिजे तितकेच मीठ वाढून घेते.

आम्ही एका लग्नात जेवायला गेलो होतो. ताटे वाढून झाली.जेवायची सूचना होणार एवढ्यात तिघे-चौघे समोर येऊन उभे राहिले. त्यापैकी एकाने म्हटले, ''आम्ही मनापासून स्वयंपाक केलाय. तुम्ही भरपूर खा, पण ताटात टाकू नका. आमचं काही चुकलं असं आम्हाला वाटेल.'' त्यांनी वाढणाऱ्यांनाही सूचना दिली की थोडे थोडे वाढा, विचारून वाढा. आमची चतकोर पोळी खाऊन होईपर्यंत पोळीवाले तीन-चारदा येऊन जायचे. प्रत्येक पदार्थांचे असेच व्हायचे. याचा चांगला परिणाम दिसून आला हं!

आम्ही एका हॉटेलात (पुण्यातील!) जेवायला गेलो होतो.तिथे फलक वाचला, 'तुम्ही ताटात ठेवलेल्या अन्नात कित्येकांचे जेवण होईल.'



आणखी मजा म्हणजे माझ्या चार वर्षांच्या बहिणीलाही आम्ही असेच वळण लावतो आहोत, पण त्यामुळे काही वेळा आईवर भलता प्रसंग ओढवतो. एकदा आईची एक प्रौढ मैत्रीण आली होती. आईच्या आग्रहामुळे ती जेवायला बसली. जेवण झाले तेव्हा ताटात भाजी उरली होती. ती पाहून प्राजक्ता म्हणाली, ''ताटात भाजी का ठेवली?'' त्या म्हणाल्या, ''अगं, माझं जेवण झालं'' ''मग इतकी भाजी का घेतली होती?'' त्यांना उत्तरच सुचेना. माझ्या आईलाही काय बोलावे ते कळेना. शेवटी प्राजक्ताच म्हणाली, ''आता या भाजीचं आम्ही काय करायचं?''

माझ्या परिचयाच्या एक आजीबाई आहेत. कोठेही जेवायला गेल्या की त्या रस पिळलेली लिंबाची फोडही चावून खातात. मला आश्चर्य वाटले, तेव्हा त्या म्हणाल्या, ''अगं, सुरुवातीला ही फोड थोडी तुरट लागते; पण नंतर तोंडाला छान चव येते.'' मात्र हा अनुभव अजून माझ्या अंगवळणी पडायचाय!

सांगायचं एवढेच 'ऊतू नका मातू नका घेतला पदार्थ टाकू नका.'

अन्नाची नासाडी थांबवण्याचा प्रयत्न, जेवणानंतर किंवा जेवणापर्यंतच आवश्यक आहे असे नाही, तर स्वयंपाकाची भांडी घासायला टाकतानाही आवश्यक आहे; म्हणून आम्ही स्वयंपाक केलेली भांडी लखख खरडून-पुसून घासायला टाकतो. त्यामुळे आमच्या भांडीवाल्या मावशीही खूष असतात!

मग मित्रांनो, तुम्हीही अन्नाची नासाडी थांबवायचा प्रयत्न करणार ना! स्वत: तर अन्न वाया घालवू नकाच पण इतरांनाही तसे अवश्य सांगा. ▯

**जाई ताकमोगे**, इ. ६वी,
चौगुलेवाडा,ब्राह्मणपुरी, मिरज ४१६४१०
**चित्रकर्ता – केदार मेहता**, इ. ९वी

 **नको हे नको ते, असे काय येथे असा घोकुनि मंत्र बाराक्षरी। किती नाश झाला,पहा काय गेले! अती शाहण्या मन्मना! अंतरी!**

# पर्यावरण विचार




**सं**तानी भक्ती, अध्यात्म, चिंतन आणि तात्त्विक मूल्यांची शिकवण दिली. तसेच ज्या देहाच्या आधारे परमात्म स्वरूपाकडे जायचे आहे, तो देह निरोगी, सुदृढ, प्रसन्न आणि आनंदी राहावा यासाठी पर्यावरणाचे महत्त्व सांगितले आहे. ज्याच्या सान्निध्यात मानवी देह वावरणार आहे, ते निसर्गसान्निध्य विपुल, व्यापक आणि शुद्ध असायला हवे,अशी संतांची धारणा आहे. एकीकडे भारतात अनंत काळापासून नांदत असलेली कृषिसंस्कृती आणि दुसरीकडे तत्त्ववेत्यांनी सांगितलेले पंचमहाभूतांचे महत्त्व या दोहोंतून पर्यावरणाच्या संदर्भातील चिंतन प्राचीन ग्रंथात आणि संत वाङ्मयात प्रभावीपणे मांडलेले आहे. जीवन जगताना, निसर्गात वावरताना अवती-भोवती दिसणारे, जाणवणारे पर्यावरणाचे घटक सर्वसामान्यांच्या परिचयाचे आहेत. वृक्षवल्ली, डोंगर, नदी, फुले, फळे , पशुपक्षी, वारा, सूर्य, कीटक, गायी, गुरे, वने, अरण्ये, पाऊस इत्यादी घटकांना कधी उपमा, कधी रूपक, कधी सिद्धांत तर कधी दृष्टांत अशा स्वरूपात ठायी ठायी मांडून आपल्या वाङ्मयातून मराठी संतांनी पर्यावरणाची नवी दृष्टीच दिली आहे.त्याप्रमाणे संतवाङ्मयात पर्यावरणाचा व त्यासाठी आवश्यक अशा बाबींचा अनेकदा उल्लेख आढळतो.

स्वत: ज्ञानेश्वरांनीच निरनिराळ्या ठिकाणी वने लावावीत असे म्हटले आहे.ते म्हणतात,

**नगरेचि रचावि । जलाशये निर्मावी ।**
**महावने लावावी । नानाविधे ।**

या वन विस्ताराचे महत्त्व सांगताना पुढे ते म्हणतात,

**पाहे पा आरंभी बीज बीज एकले ।**
**मग तेचि विरुठलिया बुड जाहले ।**
**बुडी कोंब निघाले । खांदियाचे ।।**
**खांदियापासुनि अनेक ।**
**पसरलिया शाखोपशाखा ।**
**शाखास्तव देखा । पल्लवपाने ।।**
**पल्लवी फूल फळ ।**
**एवं वृक्षत्व जाहले सकळ ।**
**ते निर्धारिता केवळ । बीजची ते ।।**

झाडाला पाणी घालणाऱ्यालाआणि तोडणाऱ्याला दोघांनाही झाड सावलीच देत असते.ते आपले कर्म करताना भेदभाव करीत नाही.

पुढे ज्ञानेश्वर माऊली म्हणतात,

**जो खांडावया घावो घाली ।**
**का लावणी जयाने केली ।**
**दोघां एकचि सावली । वृक्षु दे जैसा ।।**

झाडाझुडुपांनी युक्त वनाबद्दल ते म्हणतात,


**वसंत तेथे वने । वन तेथे सुमने ।**
**सुमनी पालिंगने। सारंगांची ।।**
**गुरु तेथे ज्ञान । ज्ञानी आत्मदर्शन ।**
**दर्शनी समाधान। आधि जैसे**

संत तुकारामांनी त्या काळातही पर्यावरणाचे आपल्या मानवी जीवनातील महत्त्व ओळखले होते. निसर्गातील वृक्षवल्ली आणि त्यांच्या सान्निध्यात राहणारे सर्व प्राणी आपल्या नातलगांइतकेच आपल्याला प्रिय आहेत. त्यांच्या सान्निध्यात मन कसे प्रसन्न राहते, या संबंधीचे वर्णन त्यांनी आपल्या अभंगातून केले आहे. त्यांचे हे विचार पुढील अभंगातून दिसून येतात.

**'वृक्षवल्ली आम्हा सोयरी वनचरे ।**
**पक्षीही सुस्वरे गान गाती ।।**
**येणे सुखे रूचे एकांताचा वास ।**
**नाही गुण-दोष अंगा येत ।।**
**आकाश मंडप पृथ्वी हे आसन ।**
**रमे तिथे मन क्रीडा करू।।**
**आकाश मंडळू देह उपकार ।**
**जाणवतो वारा अवखळू ।।**
**तुका म्हणे होय मनासि संवाद ।**
**आपलाचि नाद आपणासी ।।'**

**विश्वल चव्हाण,इ. ९वी**
न्यू इंग्लिश स्कूल,वसई,ठाणे.
हस्तलिखित 'ग्यानबा तुकाराम'
(हस्तलिखित स्पर्धा ९८-९९)
**चित्रकर्ती - वृषाली बाभुळकर**, इ. ८वी

# इतिहास बदलणारा कुत्रा



**त्या**च्या घरातील सर्व लोक लाडाने त्याला एब म्हणून हाका मारीत.एब मोठा मेहनती मुलगा होता. त्याचे वडील शेतमजूर होते. दिवसभर ते शेतावर काम करीत, तरीही त्यांना चांगले घर, चांगले जेवण मिळत नव्हते. एका लाकडी घरात ते लोक राहत, तरीही ते खूश असत.

एबही आपल्या वडिलांबरोबर शेतात काम करीत असे. एबची आई एबवर खूप प्रेम करी. ती त्याला चांगल्या चांगल्या गोष्टी ऐकवत असे.

एके दिवशीची गोष्ट. एब व त्याचे वडील शेतावरून घरी येत होते. रस्त्यात त्याला एक कुत्रे दिसले. कोण्या खोडकर मुलांनी त्याच्या पायाला जखम केलेली होती. ते 'कुई कुईऽऽ' करत लंगडत होते. एबने कुत्र्यास उचलून घेतले. ते दुःखामुळे अजूनही केकाटत होते. जणू काही त्याला हे कळत होते. एबने त्याच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवला, तेव्हा ते कुत्रे खरोखरच शांत झाले.

घरी आल्यावर एबने कुत्र्याची जखम पाण्याने धुऊन काढली व तिच्यावर पट्टी बांधली. त्या रात्री एबने कुत्र्यास आपल्या बिछान्याखाली झोपविले. दुसऱ्या दिवशी पुन्हा मलमपट्टी केली. असा क्रम बरेच दिवस चालला. हळूहळू कुत्र्याची जखम भरत आली. तो आत्तापूर्वीपर्यंत एब व कुत्र्याची चांगली मैत्री जमली होती. एब कोठेही गेला तरी तो कुत्रा त्याच्याबरोबर असे.

एके दिवशी जंगलात ससा पकडण्यासाठी म्हणून, एब सकाळी सकाळीच आपल्या कुत्र्यासह घरातून बाहेर पडला. दुपार टळून गेली, तरीही एब परत आला नाही, तेव्हा आईला त्याची काळजी वाटू लागली. एब घरी न आल्यामुळे शेजारी-पाजारी सगळेच त्याची काळजी करू लागले. एबच्या शोधासाठी सर्व लोक जंगलाकडे निघाले. त्यांनी जंगलाचा कोपरा न् कोपरा धुंडाळला. रात्र होण्याची वेळ आली, पण एबचा कोठेच शोध लागला नाही. सर्वजण निराश होऊन घराकडे वळणार तेवढ्यात त्यांना कुत्र्याच्या भुंकण्याचा आवाज आला. एबच्या वडिलांनी कुत्र्याचा आवाज ओळखला. ते कुत्र्याजवळ आले. त्यांनी पाहिले, कुत्रा वारंवार एका मोठ्या दगडावर आपले पंजे मारीत आहे. दगड बराच मोठा होता. कुत्रा त्याला हटविण्याचा प्रयत्न करीत होता. थांबून थांबून तो भुंके. दगड एका गुहेच्या तोंडाशी बसला होता. सगळ्यांनी मिळून दगड बाजूला सारला, तेव्हा गुहेत अडकलेला एब त्यांना दिसला.

एबच्या वडिलांनी एबला विचारले, ''गुहेत कसा काय अडकलास?''

''मी या गुहेत ससे पाहिले, त्यांना धरण्याकरिता आत घुसलो तेवढ्यात हा दगड डोंगरावरून घरंगळत आला व त्याने गुहेचे दार बंद केले.'' एबने सविस्तर वर्णन केले.

''या कुत्र्याने एबला वाचवले.सर्व लोक कुत्र्याची प्रशंसा करू लागले. त्यादिवशी एबने कुत्र्याचा जीव वाचविला होता. आज कुत्र्याने एबचा जीव वाचविला.

पुढे मोठा झाल्यावर एब प्रसिद्ध पहिलवान झाला. त्याने हँडबॉल व बेसबॉलमध्येही खूप प्रावीण्य मिळवले. पोहण्यातही त्याची बरोबरी कोणी करीत नसे. निशाणेबाजीत, घोडेस्वारीमध्येही त्याने प्रावीण्य मिळवले.

यापेक्षाही मोठी गोष्ट म्हणजे, कालांतराने तो अमेरिकेसारख्या मोठ्या दोशाचा अध्यक्ष बनला. एका कुत्र्याने अमेरिकेचा इतिहास बदलला होता. कारण ज्या मुलाचा त्याने जीव वाचवला होता. तो एब म्हणजेच अब्राहम लिंकन!

**प्रयाग सेठिया**, इ. ६वी,
ज्ञान प्रबोधिनी, पुणे
('किलबिल' हस्तलिखितामधून)
**चित्रकर्ती – अलकनंदा चुनेकर**,इ.८वी

# छात्र प्रबोधनद्वारा एप्रिल-मे-जून मध्ये झालेली शिबिरे

**छात्र** प्रबोधनद्वारा एप्रिल-मे-जून मध्ये झालेल्या विविध ठिकाणांच्या व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरांची काही वृत्ते आपण मागील अंकात वाचलेली आहेतच. अशीच काही शिबिरे महाराष्ट्रातील इतर ठिकाणीही झाली.त्यांची थोडक्यात वृत्ते आपण वाचूया. विशेष म्हणजे बहुतेक सर्व शिबिरे स्थानिक एफ.वाय.,एस.वाय. ला शिकत असलेल्या युवक-युवतींनी घेतली. त्यांचे मन:पुर्वक अभिनंदन!

**इचलकरंजी (२६ ते ३० एप्रिल) –** पाचवी ते नववीतील एकूण ३० मुलांसाठी हे शिबिर घेतले गेले. शिबिरातील कथाकथन, पद्यगायन इत्यादी सत्रे मुलांना विशेष आवडली. शिबिरात मुलांनी गटागटाने मिळून गावाचा इतिहास,इलेक्ट्रॉनिक उपकरणांची माहिती,परिसरातील झाडे, पक्षी, कापसामधून कापडनिर्मिती यासारखे नवीन प्रकल्प करून त्यांचे उत्तम सादरीकरण केले. रांगोळी काढणे, आईस्क्रीम पॉटमध्ये आईस्क्रीम तयार करणे. फ्युज बसविणे, डिमांड ड्राफ्ट काढणे, कुरिअर करणे यासारखी विविध कृतीकौशल्ये शिबिरात मुलांनी केली. शिबिराचा समारोप वारणानगर येथील अभ्यासपूर्ण सहलीने झाले. या सहलीत मुलांनी वारणानगर प्रकल्प,साखर कारखाना,कागद कारखाना,डेअरी,स्मृती वन,गुरूकुल विद्यालय, नर्सरी या संस्था पाहिल्या. दिल्ली संसद भवनाचं छोटं रूप असणाऱ्या शेतकरी कार्यालयानं मुलांचं स्वागत केलं.परिसराचे विद्यमान संचालक श्री.विनय कोरे यांची मुलांनी भेट व मुलाखत घेतली.

शिबिराला सहकार्य करणाऱ्या वारणानगर परिसरातील संस्थांच्या दारात रांगोळी काढून मुलांनी त्यांचे नावीन्यपूर्णरीतीने आभार मानले. उत्साही शिबिरार्थींना बक्षीस म्हणून गुलाब, मोगरा, सायली इ.ची रोपे देण्यात आली.

**नाशिक(२ ते ७ मे) –** पाचवी ते आठवीच्या मुलींसाठी हे शिबिर घेण्यात आले. यात मुली लिफाफा, दोऱ्याचे शुभेच्छापत्र इ.वस्तू शिकल्या. प्रकट वाचनासंबंधी काही कौशल्ये शिकण्यात आली. स्वसंरक्षणाची काही कौशल्ये मुली शिकल्या. पाळणाघर चालवणाऱ्या आजी, सायकलमार्ट चालवणाऱ्या आजी,अशा काही लोकांच्या मुलाखती मुलींनी घेतल्या. स्टेट बँकेला भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती मुलींनी मिळविली.मुली सोमेश्वराच्या जवळील निर्मल-ग्राम निर्माण केंद्रात जाऊन स्वच्छतेचे महत्त्व शिकून आल्या.एकूण शिबिर मुलींना फार आवडले.

**अलिबाग (८ ते १० मे) –** इयत्ता चौथी ते सहावीच्या एकूण २६ मुलामुलींसाठी हे शिबिर घेतले गेले. दररोज शिबिराची सुरुवात उपासना, सूर्यनमस्काराने होत असे. शिबिरातील पहिले सत्र मुलांना छोट्या-मोठ्या समस्यांवर स्वत: विचार करून निर्णय घेता येण्यासाठी 'मुलाचे स्वत:चे मत' असे चर्चासत्र घेतले गेले. गटकार्यात एकमेकांना मदत करत आपले काम पूर्ण करायला मुले शिकली. गोष्टी तयार करणे, चित्रनिर्मिती, खजिना शोध, त्रिमितीयुक्त प्रतिकृती तयार करणे; यासारख्या नवीन केळांतून मुलांनी शिबिराचा आनंद लुटला. एके दिवशी रात्रीचा केलेला मुक्काम व डोंगरभागातली छोटी सहल मुलांना फारच आवडली.

**सांगली(२८ मे ते २ जून) –** शिबिराचे प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे ते शिबिर 'विज्ञान प्रयोग शिबिर' होते. तसेच निवासीही होते. उपासना, वाचन, व्यायाम, व्याख्याने, विज्ञान प्रयोग, वैज्ञानिक खेळणी तयार करणे,विज्ञान प्रकल्प करणे,मैदानी खेळ,स्लाईड-शो असा एकूण शिबिराचा दिनक्रम होता.प्रथम चार गटांनी पेंड्युलम, इलेक्ट्रोलिसिस, क्रोमॅटोग्राफी व चुंबकीय क्षेत्र मोजणे, असे वेगवेगळे प्रयोग केले.या प्रयोगांमध्ये नेहमीच्या प्रयोगाव्यतिरिक्त अमूक ऐवजी तमूक वापरले तर काय होईल? दोऱ्याऐवजी रबर वापरले तर काय होईल? अशा प्रकारे असंख्य प्रयोग मुलामुलींनी करून पाहिले. त्याची निरीक्षणे नोंदवली. वैज्ञानिक उपकरणे/ खेळणे तयार करण्याच्या सत्रात १ ग्रॅ.पासून पुढे वजन करणारा पोस्टकार्डाचा तराजू, सुरेल खेळणे, शोभादर्शक अशा विविध गोष्टी केल्या. मुलांच्या गटाने एका भागातील प्रदूषण समस्या, विविध प्रकारच्या कापडांचे गुणधर्म तपासणे तर मुलींच्या गटाने डिटर्जंट पावडरींबाबतचा प्रकल्प केला. त्यात डिटर्जंटची लोकप्रियता, पाण्यात विरघळण्याची क्षमता,फेस तयार करण्याची क्षमता, सुफेन, दुष्फेन पाणी व शेवटी चांगला डिटर्जंट कोणता यासंबंधी निष्कर्ष इ.गोष्टी पडताळल्या. उत्तम लेखन व सुंदर सादरीकरणही केले. शिबिरात मुलांना संगणकतज्ज्ञ श्री.गोसावी सरांनी सर्वांना समजेल अशा भाषेत संगणक, इंटरनेट व ई.मेल संबंधी माहिती दिली. तसेच त्याचे प्रात्यक्षिकही मुलांनी पाहिले. तिसऱ्या दिवशी मुलांनी रक्तातील लाल पेशी सूक्ष्मदर्शकावर पाहिल्या. सायलेंट व्हॅली, केरळ येथील प्राणी, फुलपाखरे, उडणारे साप अशा १००विविध स्लाईडस्चा शो मुलांना दाखवण्यात आला. सांगलीजवळ अंकली येथे चालू असलेल्या एका मोठ्या पुलाचे बांधकाम पाहून मुलांनी

त्यासंबंधी माहिती मिळविली. शेवटच्या दिवशी वारणानगर येथील पेपर मिल, साखर कारकाना व दूध डेअरीला मुलांनी भेट दिली. दिवसातील ७–८ तास विज्ञान विषयक कृतिसत्र व्याख्याने असूनही सर्वजण खूप उत्साहाने सर्व गोष्टींमध्ये सहभागी होत होते.

**सातारा (२ व ३ जून) –** पाचवी ते नववीच्या एकूण ४५ मुलामुलींना या शिबिरात भाग घेतला. 'प्रश्नमंजुषा' सत्रात विविध क्षेत्रातील प्रश्न विचारून मुलांच्या सामान्य ज्ञानाची चाचणी घेतली. 'क्रिकेट फीव्हर' या विषयावर दोन गटात वादविवाद झाला. आसपासच्या बुद्धीजीवी व कष्टजीवी व्यक्तींच्या मुलाखती घेऊन कारगिलमधील 'ऑपरेशन विजय' संदर्भात काही मते मुलांनी मिळविली. ओरिगामीतील वस्तू, प्रतिभाविकसन खेळ, समूहगीते, आदि गोष्टींनी शिबिराची रंगत वाढली.

**धुळे (७ ते ११ जून) –** या शिबिरात ५३ मुली सहभागी झाल्या होत्या. दररोज शिबिराची सुरुवात उपासना व उतारावाचनाने होत असे. शिबिरात विविध विषयावर तज्ज्ञांची सोप्या भाषेतील व्याख्याने झाली. याबरोबर कलासत्रात मोत्याची अंगठी, सिरॅमिक पेंटिंग, दोऱ्याचा आकाशकंदील अशा वस्तू मुली शिकल्या. गटकार्यात आगळ्यावेगळ्या विषयांवर पथनाट्ये सादर करणे, भित्तीपत्रके तयार करणे, दिलेल्या साहित्यातून विविध वस्तू तयार करणे, आदर्श गावाची प्रतिकृती तयार करणे इ.कामे कमी वेळात, सर्वांनी मिळून, कल्पकतेने पूर्ण केली.

शेवटच्या दिवशी डेडरगांवला सहल आयोजित केली होती. या सहलीत मुलींनी जलशुद्धीकरण केंद्र, विपश्यना केंद्र इ.ठिकाणी भेट दिली. वृक्षारोपणही केले. समूहगीते, मैदानी खेळ यामुळे शिबिराचा आनंद वाढला.

**रसायनी (अभ्याससहल) (२७ ते २९ मे) –** आपल्या आसपासचा परिसर जाणून घेण्यासाठी रसायनी केंद्राद्वारा ३ दिवसांची छोटी अभ्याससहल योजण्यात आली. प्रथम नारंगी येथील ग्रामीण साम्यकुल प्रकल्पाची माहिती घेतली. त्यानंतर गागेदे व विनोबानगर या गावांत जाऊन पूज्य विनोबाजींच्या संदर्भातील काही घटनांची माहिती मुलांनी मिळवली. नंतर वरसई येथील ऐतिहासिक वैजनाथ मंदिर, बाळगंगा नदी, देवराई, सुदर्शन आयुर्वेद भवन हा औषध कारखाना इ.पाहून मुले थक्क झाली. रात्री पेण येथे मुक्काम करून दुसऱ्या दिवशी सकाळी मुलांनी अलिबाग येथील 'भू' चुंबकीय वेधशाळा पाहिली. समुद्रकिनाऱ्यावर मौजमजा करून त्यानंतर कणकेश्वर येथील डोंगरावरच्या सहलीचा मुलांनी भरपूर आनंद लुटला. परतीच्या प्रवासात गर्द झाडीतून करवंदांचा आस्वाद घेत सर्वजण कणकेश्वरहून झिराड येते आले.श्री करमरकरांचे शिल्पकल ा केंद्र हे सहलीचे विशेष आकर्षण ठरले. एरवी चालायचा कंटाळा करणारी मुले २५ कि.मी.ची चाल आनंदाने पार पाडताना दिसली. मुलांनी सहलीची मनमुराद मजा लुटली. आपल्या परिसराची ही नव्याने झालेली ओळख मुलांच्या दीर्घकाळ स्मरणात राहील.

## पुण्यातील निवासी शिबिरे

**१. संयोजक प्रशिक्षण शिबिर–** १५ ते १९ एप्रिल.२५ वर्षे व पुढील २५ सदस्य शिबिरात उपस्थित होते. आपापल्या गावात विद्यार्थ्यांसाठी उपक्रम कसे घ्यावेत याबाबत विविध व्याख्याने–चर्चासत्रे–कृतिसत्रे झाली. एक दिवस शिबिरार्थींनी मुलामुलींचे ६ तासांचे मेळावेही घेतले.

**२. नेतृत्व प्रशिक्षण शिबिरे–** मुलांसाठी १३ ते २० मे व मुलींसाठी २३ ते २९ मे या काळात शिबिरे झाली. पहिले ५ दिवस नेतृत्व कौशल्यांचे प्रशिक्षण विविध अनुभव–कृतिसत्रे–व्याख्याने यांच्या आधारे देण्यात आले व शेवटी सर्वांनी गटागटाने ग्रामीण भागात जाऊन तेथील मुलामुलींचे एक दिवसाचे शिबिर घेतले. आत्मविश्वास वाढायला या शिबिराचा निश्चितच उपयोग झाला.

**३. रूप पालटू शिक्षणाचे–**नुकत्याच बी.एड्.शिक्षकांसाठी ६ ते १२ मे या काळात हे शिबिर झाले. त्यामध्ये महाराष्ट्रातल्या १५ बी.एड्.महाविद्यालयांमधून ३७ सदस्य सहभागी झाले होते. शिक्षणातल्या वेगळ्या वाटा, शिक्षणक्षेत्रातले प्रश्न व ते सोडविण्यासाठी आवश्यक कौशल्ये, यासंबंधी व्याख्याने–चर्चासत्रे, परिसंवाद, कृतिसत्रे, प्रकल्प भेटी, सहल असे कार्यक्रम झाले. 'आमच्यातली विधायक प्रेरणा जागी झाली व आमच्या गावांमध्ये गेल्यावर शिक्षणक्षेत्रामध्ये पदार्पण करताना या शिबिराचा आम्हाला खूप उपयोग होईल' असे अनेकांनी सांगितले.

**४. शिक्षक प्रशिक्षण शिबिर –** शाळांमध्ये शिकवत असलेल्या शिक्षकांसाठी ६ ते १२ जून या काळात हे शिबिर झाले. महाराष्ट्राच्या विविध भागांमधील १४ शाळांमधील ४० शिक्षक व छात्र प्रबोधनच्या केंद्रावरील संयोजकांपैकी १५ संयोजकांनी या शिबिरात भाग घेतला. स्वयंअध्ययन कौशल्ये, वाचन कौशल्य, बरची नृत्य व विद्याव्रत संस्कार या चार उपक्रमांचे प्रशिक्षण या शिबिरामध्ये दिले गेले. त्याशिवाय विविध शाळांमधील वैशिष्ट्यपूर्ण उपक्रमांबाबतही परस्पर देवाणघेवाण झाली. प्रत्येक शाळेतील दोन विद्यार्थीही बरची नृत्य शिकण्यासाठी येथे आले होते. पुढे वर्षभर या शाळांमध्ये हे शिक्षक व विद्यार्थी उपक्रम राबविणार आहेत. ▯

संकलन – कु. गुंजन कुलकर्णी

# सिंहावलोकन सातव्या वर्षाचे

छात्र **प्रबोधन**

**सौर श्रावण शके १९२० ते सौर आषाढ शके १९२१ (१९९८-९९)**

### मासिकाची वाटचाल


१. लागोपाठ पाचव्या वर्षी छात्र प्रबोधनच्या दिवाळी अंकास दोन पुरस्कार मिळाले.
२. अनेक नवे उपक्रम, शिबिरे यशस्वीपणे आयोजित केली गेली.सभासद संख्या ५५० झाली.
३. 'तुम्हीच संपादक व्हा' व 'पंख सुरांचे' ध्वनिफीत निर्मिती स्पर्धा, या दोन नावीन्यपूर्ण स्पर्धांचे राज्यस्तरावर आयोजन. दुसऱ्यांदा यशस्वीपणे आयोजीत करण्यात आलेल्या या स्पर्धेत २० शाळा, (७४ हस्तलिखिते व ४ ध्वनिफिती) सहभागी झाल्या होत्या.
४. दिवाळी अंकासोबत छात्र प्रबोधनचा दुसरा इंग्रजी अंक प्रकाशित झाला.
५. वर्षभरात मुलांच्या लेखनाने, चित्रांनी व मुलांच्याच मुखपृष्ठाने सजलेले, पूर्णत: मुलांचे असे दोन अंक.
६. महाराष्ट्र, गोवा व बेळगाव मिळून १० उपक्रम केंद्रे तर २५ ठिकाणी छात्रप्रबोधन मासिकाची नोंदणी केंद्रे तर एकूण ८५ ठिकाणी दीपावली विशेषांकाची वितरण केंद्रे यावर्षी कार्यरत होती.

(गेल्या वर्षभरातील अंकातील लेखांची विषयवार सूची खाली दिलेली आहे.लेखाआधीचा क्रमांक तो लेख या वर्षाच्या कोणत्या अंकात आहे हे दर्शवितात. प्रमुख लेखक व कवींची नावे, विषयावर सूचीनंतर शेवटी, एकत्रितपणे दिली आहेत.)

---




**कथा** १) फिनिक्स २) केकेको ३) अजगराच्या जबर विळख्यात ३) बुलबुल ३) रनर ३) उद्ध्वस्त ३) लाल शर्ट निळा रुमाल ३) काबुलीवाला ३) हसा आणि हसवा ३) एकोशी ३) हलाहल ३) एकदम गावरान ३) वाढदिवस ४) सुट्टी ५) इंडिपेन्डन्स डे ५) आई-बाबा माझ्यासाठी तरी! ६) त्वरीत फाशी द्यावं ७) सूर्यकुलाचा अंत ८) मावशीचा विजय असो. ९) आते मी एकटाच जाईन ९) समीर आणि जादूचा दिवा ९) यक्षाचा शाप ९) ते चार दिवस ९) झू....(एकांकिका) ९) होय्सळांचा सेनापती ९) धोंडी १०) रुसवा १०) पंख होते तो... १०) चौकसपणाची पंचपदी ११) कोपरा ११) तिची खंत ११) सुबुद्धी-दुर्बुद्धी १२) धाडसी नंदू १२) वनराणी १२) लेवियाड





**विज्ञान - प्रयोग - प्रकल्प - प्रतिकृती**

३) मोटर तयार करु या ५) जैव बॅटरीवर चालणारे घड्याळ ८) हायड्रोमेकॅनिकल व पवन ऊर्जा वापरून बनविलेले कापऱ्याचे यंत्र ९) एक ग्रॅम वजन मोजता येईल असा तराजू तयार करा! १०) चला प्रयोग करुया! ११) माझी वेधशाळा - पर्जन्यमापक १२) प्रयोग गमतीचे


**ज्ञान - विज्ञान -तंत्रज्ञान** १) जीवाणू २) आधुनिक हिशोबनीस ३) पर्णसाज ३) गुरुत्वीय भिंगे ३) आकाशातील देखणे प्रकाशनाट्य भाग - १ ४) ल्युसीचा शोध ४) आकाशातील देखणे प्रकाशनाट्य भाग - २ ५) वेडा राघू

६) आमचे दोन पत्ते ६) कवक प्रसृष्टी ७) शांततेसाठी अणुविज्ञान ८) ५२ व्या शतकात प्रवेश ९) अर्जन वृक्ष १०) हाकेच्या अंतरावर ११) खग्रास सूर्यग्रहण भाग - १ १२) पेटंट १२) प्राणिविशेष-जळू आणि काजवा १२) पर्यावरण विचार




**डोळस भटकंती** १) शोध सर्वोच्च शिखराचा १) गाव मनातलं २) पंचमढी २) असं आहे एव्हरेस्ट - भाग २, ३) भारताच्या सागरी मार्गाचा शोध लावणारा व्हाश्कू द-गाम ३) आकांक्षांपुढती गगन ठेंगणे (एव्हरेस्ट मोहिम) ५) असं झालं आमचं शिबिर ५) आठवणीतलं गाव-मुर्डेश्वर ५) शांतिवनात फेरफटका ७) कैलास-मान-सरोवर-एक रोमांचकारी यात्रा ९) शोध गावाच्या इतिहासाचा ९) अरण्यग्रंथ वाचनकला

१०) फेरफटका पुणे महानगराचा ११) ठसा अभ्यासहलीचा १२) सफर एक गाडीची १२) विजयदुर्ग किल्ल्याची भटकंती





**कृती-कला-हस्तकौशल्य-कोडी** १) संग्रह करता करता शिकूया! ३) चमचमता चेंडू ३) काष्ठशिल्प - एक कला ३) पाण्यावरील रांगोळी ३) दोऱ्याचा आकाशकंदील ३) तुडतुड्या ३) चला पेटी वाजवू या! ३) चिमणगाळं ३) स्ट्रॉ आणि मासे खेळ ३) कागदी मण्यांची माळ ३) तर्कतरंग ६) कॅमेरॅशी हितगुज ९) जरा डोके चालवा-चौकोनी ठोकळ्यांची मिकया ९) करून तर पाहा-काडेपेटीच्या करामती १०) चला शब्दकोडे करुया

**गंध मोहवी साहित्याचा** ३) देवाची लिपी वाचणारा अनुभव संपन्न लेखक - गो. नी. दांडेकर ४) 'गीत नवे गाईन मी' - वसंत बापट


**अभ्यासातील स्वावलंबन** १) आकलन भाग -१ २) आकलन भाग-२ ७) परीक्षेची पूर्वतयारी

**वाचलेच पाहिजे असे काही-पुस्तक परिचय** १) 'सुदाम्याचे पाहे' ५) 'माणसं' ६) 'सुपर क्लोन' ८) 'मराठी मनाच्या कोंदणातील लक्ष्मीबाई'





**गंध मोहवी साहित्याचा** १) फुटबॉलच्या महायुद्धात फ्रान्सची जीत! ४) शरीर सतेज, सुंदर... चैतन्याचे आगार ९) चिमुकल्या मणिपूरची यशस्वी गरुड झेप

**व्यक्ती परिचय-ओळख कर्तृत्वाची** १) पूर्णावतारी श्रीकृष्ण १) तेथे कर माझे जुळती (गगाधरबुवा पिंपळखरे) १) क्रिया सिद्धी : सत्वे वसति! १) पुण्यश्लोक अहिल्या एक मूर्तिमंत तेजोरूप (पु.ग. सहस्रबुद्धे) २) सामान्यातले असामान्य रूप-कर्मवीर भाऊराव ३) 'कर्तृत्वाशी जडले नाते'- युवा पिढीतील विविध क्षेत्रात, विशेष कर्तृत्व गाजविणाऱ्या व्यक्तींची मनोगते - चेतन बालवे, सावनी शेंडे, मेघना परांजपे, सुमना नाथ, अभिजित कुंटे, सुदेष्णा घारे, संजय उपाध्ये, समीर गोखले, सोनाली कुलकर्णी,




आशिष लेले ५) जीवन यांना कळले हो! (डॉ. बाविस्कर यांची मुलाखत) ६) साने गुरुजी-एक आगळे वेगळे शिक्षक ७) केल्याने होत आहे रे - समर्थ रामदास ८) प्रवास जिद्दीचा- स्मिता गाटे ८) माझी चांदबिबी - पारूबाई १०) आकाशाशी नाते माझे (अनुपमा कोहली) ११) ईश्वरचंद्रांची मातृभक्ती

**ललित** १) भात लावणीची ओली कहाणी २) बोध घ्यावा असे काही ३) प्रश्न ३) शालेय सहलमंत्री- मी आणि भ्रमंती ३) शब्दांशी मैत्री ३) प्रश्नोनिपद् ३) मनोली एक पाडस ३) सबब वीरांशी सामना ३) पुस्तकांचे तहानलाडू-भूकलाडू ३) ढगांचा खेळ ३) चुकला काळीज ठोका ३) कथा तीन व्यथा एक ३) ज्ञानदेवे रचिला पाया ४) अगदी स्केलात ४) पणती जपून ठेवा ५) पालक-शिक्षकांकडून आमच्या अपेक्षा ५) मी मुलगी आहे म्हणून... ५) हा खेळ जीवनाचा ६) जरूर पाहावे असे काही- बेनहर ६) मधुबोल ७) भाव एक छटा अनेक ७) अंतरीचे धावे स्वभावे बाहेरी ८) ८) मैत्री तुझी, माझी, आपली ८) गमईमालूसी कथा ८) परीक्षेचा बागलबुवा ८) वक्तृत्व अवधानाचा होय चारा! ९) स्वयंनिर्देशित वाक्ये ९) सामना एका महाराक्षसाशी१०) माझी मी १०) मूल्यशिक्षण हवं का नको? ११) थांबला तो संपला १२) सुसंवाद १२) गरज माझी आजी-आजोबा १२) माझी जगावेगळी मैत्रिण १२) फुलाचे आत्मकथन १२) इतिहास बदलणारा कुत्रा




**वैचारिक, प्रासंगिक व स्फूट** २) लोकसभेच्या इतिहासातील निंद्य दिवस ६) १९९८ बिंब-प्रतिबिंब ६) ओळख 'भारतरत्न' पुरस्कारांची ६) १०० दिवसांची शाळा ८) शीलं परंम् भूषणम् ९) एक चैतन्यपर्व लोपले (कुसुमाग्रजांच्या ज्ञानपीठ पुरस्काराच्या वेळच्या भाषणाचा गोषवारा) ११) वर्षारंभ उपासना ११) मी कोण होणार? निर्णय कसा घ्यावा?


**कविता** १) वाट १) नाचू पाण्यात २) प्रार्थना २) माय ३) साद घाली रानवारा ३) नदी ३) माझ्या आभाळीचा तारा ३) माझी बहीण ३) चला




३) इवल्याचे गाणे ३) जय विज्ञान ३) आद्य विद्यानिधी ३) नवे वर्ष घडवू ३) कुणी ना कुणी ३) आंब्याची कोय-लावते सोय ३) निळ्या आभाळाच्या खाली ३) झेप ३) नीतीचा लावू दीप ३) खिडकी बाहेरचे पुस्तक ३) एक एक धागा विणावा ४) माय वावराला जाते ४) आम्ही स्वप्नांचे राजे ५) कसं असावं मन ५) निसर्गाची स्वप्ननगरी ५) नाच गं घुमा ५) पैसा ६) मुशाफिराचे गाणे ६) भ्रष्टाचार निंदा स्तोत्रम् ७) फूल ७) मित्र ८) स्वच्छंद ८) आई ९) पालखी ९) ज्योत अंतरीची ९) ससोबाचे बोल ९) संध्याकाळ ९) प्रतिभेचे पिंपळपान १०) मी कोण आहे? १०) चांदणी नोवरी झाली ११) तुझ्या मनात दया असू दे ११) काळ्या काळ्या ढगा १२) असेच साने गुरुजी होते १२) शब्दांची किमया १२) आजी १२) हुशार


**मलपृष्ठावरील गीते** १) स्वातंत्र्याचा सूर्य २) सरस्वती स्तवन ४) संस्कृती अमुची कल्याणी ५) यश तुझे झळकू दे दिगंतर, तू विसरू नको राष्ट्रास तरी ६) आपण सारे गाऊ

या ७) आव्हान हे ज्योतिंना ८) 'माणूस' सुंदर घडवू या ९) निर्धार १०) प्रबोधिनीत यायचे ११) चंदन है इस देशकी माटी ११) हे विश्वात्मक




**जाहीर केलेल्या स्पर्धा/आवाहन** ३) 'तुम्हीच संपादक व्हा!', 'पंख सुरांचे'- ध्वनिफीत (कॅसेट) निर्मिती स्पर्धा, मुलाखत घ्या व लिहा ८) 'छात्र प्रबोधन'चा अंक तुम्हीच तयार करा ८) मी कॉपी करणार नाही,आम्ही कॉपी करू देणार नाही. ९ ते ११) व्यावहारिक कौशल्यामध्ये तुम्ही कोठे आहात? भाग १ ते ३

**छात्र प्रबोधनचे सन्मान्य लेखक** शैलजा देखमुख, चारुता पुराणिक, विजय देवधर, लीला दीक्षित, संजय ढोले, सुहासिनी देशपांडे, मृणालिनी गडकरी, बाळ गाडगीळ, हरिहर आठलेकर, मुकुंद जोगळेकर, शकुंतला फडणीस, सुहास महाजनी, नयनतारा देसाई, प्रभाकर सोवनी, भा.रा. भागवत, योगेश सोमण, मीना वांगीकर, गोविंद गोडबोले, अनुराधा वैद्य, अश्विनी धोंगडे, सुधाकर प्रभू, आश्लेषा महाजन, निरंजन घाटे, शुभदा गोगटे, विवेक पोंक्षे, सी.के. देसाई, पुरुषोत्तम जोशी,




कविता भालेराव, कांचनगंगा गंधे, जयंत नारळीकर, प्रकाश तुपे, बाळ फोंडके, किरण पुरंदरे, प्रकाश जोगळेकर, वर्षा कुलकर्णी, सुनील मोरे, अंजली तळेगावकर, प्र.के. घाणेकर, निनाद बेडेकर, आनंद पाळंदे, लक्ष्मीकांत तोष्णीवाल, अविनाश सोवनी, सुरेशचंद्र वारघडे, उक्षाल गुर्जर, वसंत थिटे, रेखा जोशी, वा. ना. दांडेकर, कल्याणी केसकर, विद्या नारळकर, अरविंद गुप्ता, सतीश देशपांडे, अनुराधा धुपकर, अनिता पाटील, मीरा पटारे, मिलिंद ढमढेरे, मनोज देवळेकर, हेमंत जोगदेव, वि.म.कुलकर्णी, सुलभा जोगळेकर, स्वाती ढेकणे, व. दि. कुलकर्णी, दीपाली गोगटे, अरविंद कपोले, गिरीशराव बापट, वर्षा तोडमल, संजीवनी बोकील, सुरेश करंदीकर, राम डिंबळे, दत्ता टोळ, रामचंद्र देखणे, यशवंत पाठक, मंगला गोडबोले, मारुती चितमपल्ली, पुरुषोत्तम पाटील, अनंत भावे, मल्हार अरणकल्ले, वि.गो. कुलकर्णी, ल.ना. गोडबोले, नीलिमा करमरकर, गीतांजली देगावकर, अशोक ताकमोगे, रेणू दांडेकर, अनघा लवळेकर, राम शेवाळकर, आ.ना. पेडणेकर, प्रकाश गोळे, लीला गोविलकर, तुषार ठोंबरे, राहुल नांगरे, विसुभाऊ गुर्जर, शैलजा राजे, श्रीराम गीत याशिवाय अनेक विद्यार्थी लेखकांनीही 'छात्र प्रबोधन'साठी लेखन केलेले आहे.




**छात्र प्रबोधन-कवी** किरण पुरंदरे, सरिता पदकी, शोभा बडवे, आतिश सोसे, शांता शेळके, अंजली कुलकर्णी, अरुणा ढेरे, इंद्रजित भालेराव, किशोर पाठक, दत्ता हलसगीकर, राजलक्ष्मी देशपांडे, गंगाधर महांबरे, रवींद्र भट, संजीवनी मराठे, सुरेश सावंत, संगीता बर्वे, आश्लेषा महाजन, कल्याण इनामदार, प्रवीण दवणे, वि.म. कुलकर्णी, वर्षा तोडमल, स्वाती सामक, अरविंद लेले, प्रभावती माळी, सुमती पवार, अरविंद देशपांडे, रमेश चव्हाण.याशिवाय अनेक विद्यार्थ्यांनी'छात्र प्रबोधन'साठी कविता लेखन केलेले आहे.

**मासिक कार्यक्रम** (गावोगावच्या संयोजकांनी करावयाचे कार्यक्रम)

१. गणेशोत्सव मंडळातील कार्यकर्त्यांशी गप्पा व सहभाग.

२. दिवाळीच्या सुट्टीतील सायकल सहल.
४. विद्यार्थ्यांची शारीरिक तंदुरुस्ती मोजणे,छात्र प्रबोधन आयोजित स्पर्धांमध्ये परिसरातील शाळा सहभागी होण्यासाठी प्रयत्न करणे.
५. आपल्या गावाचा/शहराचा/उपनगराचा नकाशा तयार करा.
६. स्वामी विवेकानंद जयंतीनिमित्त विविध उपक्रम.
८. सुट्ट्यांमध्ये विद्यार्थ्यांकडून विविध विषयांवरील प्रकल्प करून घेणे.
९. विद्यार्थ्यांचे विक्री कौशल्य वाढविण्यासाठी विविध विक्री उपक्रम करून घेणे.
१०. आपल्या गावाची विविध अंगांनी ओळख करून घ्या.
११. वर्षारंभ समारंभाचे आयोजन.
१२. कारगिलनिमित्त जनजागरण.

## उपक्रमांची वाटचाल

* छात्र प्रबोधनचे गेले ३-४ वर्ष सभासद असलेल्या, पूर्वीच्या शिबिरांमध्ये सहभागी झालेल्या बारावीच्या वरील मुलामुलींच्या ३ स्वतंत्र **अभ्याससहली**, विदर्भ व रायगड-मुंबई-ठाणे परिसरात, विविध सामाजिक प्रकल्प पाहण्यासाठी गेल्या होत्या. त्यामध्ये ४५ जण सहभागी झाले. * विद्यार्थ्यांसाठी २ **नेतृत्व प्रशिक्षणाची** ८ दिवसांची निवासी शिबिरे, २ **ग्रामीण परिचयाची** तंबूमधील ८ दिवसांची **निवासी शिबिरे** (रायगड परिसरात), १५ ठिकाणी ३ ते ५ दिवसांची **व्यक्तिमत्त्व विकसन शिबिरे** झाली.तसेच २ ठिकाणी निवासी शिबिरेही झाली.या व्यतिरिक्त १५ ठिकाणी **दहावी अभ्यास** मार्गदर्शन, १० ठिकाणी वर्षभर **साप्ताहिक-पाक्षिक कार्यक्रम**, ३० ठिकाणी **प्रासंगिक मेळावे** झाले. या सर्वांमधून सुमारे **२५०० विद्यार्थी सहभागी** झाले. * प्रौढ सदस्यांसाठी दोन दिवसांची **प्रबोधिनी परिचय सहल**, चार दिवसांचे **संयोजक प्रशिक्षण शिबिर** व ३० ठिकाणी **पालक सभा** योजण्यात आल्या.त्यामध्ये **२०००हून अधिक प्रौढ सदस्य उपस्थित** होते. * **शिक्षकांसाठी** जून महिन्यात आठ दिवसांचे निवासी **प्रशिक्षण शिबिर** योजले होते.त्यामध्ये १४ शाळांमधील ४२ शिक्षक सहभागी झाले होते. ४० शाळांमध्ये **शिक्षकांसाठी व्याख्याने-चर्चा-प्रश्नोत्तरे** असे कार्यक्रम झाले. महाराष्ट्रातील सुमारे २५ शिक्षणशास्त्र महाविद्यालयांमध्ये होऊ घातलेल्या शिक्षकांसाठी 'शिक्षणातली आव्हाने नव्या वाटा... नवे प्रयोग' या विषयावर व्याख्याने झाली व **'रूप पालटू शिक्षणाचे'** या नावाने **निवासी शिबिरही** झाले. * **राख्यांबरोबरच शुभेच्छापत्रांच्याही कच्च्या मालाची विक्री** यावर्षी केली. त्याद्वारा सुमारे १५०० विद्यार्थांनी राख्या व शुभेच्छापत्रे तयार करून त्यांची विक्री केली व त्यातून सर्व विद्यार्थ्यांनी मिळून रु.पन्नास हजाराहून अधिक नफा मिळवला. * गावोगावी ज्ञान प्रबोधिनीद्वारा विद्यार्थ्यांसाठी स्वयंस्फूर्तपणे विविध उपक्रम योजणाऱ्या **कार्यकर्त्यांची** डोंबिवली, इचलकरंजी व अलिबाग येथे स्वतंत्रपणे **एक दिवसाची प्रशिक्षण शिबिरे** झाली. त्याला परिसरातील मिळून १०५ कार्यकर्ते उपस्थित होते.* डोंबिवली येथे स्थानिक कार्यकर्त्यांद्वारा **विद्याव्रत संस्काराचा कार्यक्रम** झाला व त्यामध्ये विविध शाळांमधील आठवीतील १२ मुले व १२ मुली यांनी विद्याव्रत ग्रहण केले. * ज्ञान प्रबोधिनीचे **आदरणीय संचालक डॉ. गिरीशराव बापट यांनी** सांगली, इचलकरंजी, अलिबाग, डोंबिवली व बोरीवली या ५ ठिकाणच्या **उपक्रम-केंद्रांना भेटी दिल्या**. तेथे विद्यार्थ्यांनी कार्यक्रम सादर केले. कार्यकर्त्यांबरोबर बैठकी झाल्या व पालक-शिक्षक-युवासदस्यांसाठी 'एकविसाव्या शतकातील व्यक्तिमत्त्व विकसनाच्या संकल्पना' या विषयावर जाहीर व्याख्यान झाले.सर्व ठिकाणी मिळून १०००पेक्षा अधिक व्यक्ती व्याख्यानांना उपस्थित होत्या. * छात्र प्रबोधन विभागाची **वार्षिक उलाढाल सुमारे २१ लक्ष रुपयांची** झाली व अनेकांच्या आर्थिक साहाय्यामुळे आर्थिक स्वयंपूर्णता मिळवता आली.

## शके १९२१ - २२ (इसवी सन १९९९-२०००) मासिकाचे वर्ष ८वे या वर्षासाठी केलेल्या कार्यसंकल्पातील ठळक गोष्टी

विषयानुरूप लेखकांचे मेळावे, मुलांसाठी निघणाऱ्या भारतभरातील नियतकालिकांचा तौलनिक अभ्यास, सभासद संख्या ७०००, आर्थिक व कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण, किमान ५० तालुक्यांमध्ये मासिकाचा व उपक्रमांचा विस्तार, नित्य व प्रासंगिक उपक्रमांमध्ये वाढ, राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण स्पर्धेचे आयोजन, विद्यार्थ्यांच्या लेखनास विशेष प्रसिद्धी, आर्थिक स्वयंपूर्णता टिकविण्याचा प्रयत्न, ग्रामीण-इंग्रजी आवृत्त्यांचे प्रयोग.

## जुलै मध्ये करायवाचा कार्यक्रम

**'कारगिल' निमित्त जनजागरण –** काश्मिरच्या सरहद्दीवर पाकिस्तानी घुसखोरांविरुद्ध आपले भारतीय सैन्य मोठ्या जिद्दीने अन् ताकदीने लढत आहे.त्याबाबतच्या बातम्या वर्तमानपत्रात आपण वाचतो, दूरदर्शनवर पाहतो. असे असूनही अनेक शाळांमधील अनेक विद्यार्थ्यांना या युद्धाबद्दल नेमकी माहिती असेलच असे नाही.त्यासाठी विद्यार्थ्यांच्या गटाने मिळून, विविध वृत्तपत्रांमधील 'कारगिल'विषयीच्या बातम्या,लेख कापून त्याचा एक कात्रण संग्रह तयार करावा.गटाने मिळून अर्धा ते पाऊण तासाचा एक छोटा कार्यक्रम तयार करावा.त्यामध्ये एखादे स्फूर्तिगीत–समरगीत असावे.नकाशाच्या आधारे व घटनाक्रम सांगून तेथील युद्धाची, कठीण परिस्थितीची, अशाही स्थितीत लढणाऱ्या आपल्या जवानांच्या शौर्याची, उदाहरणांच्या आधारे सविस्तर माहिती द्यावी.यापुढे वृत्तपत्रांमधील यासंबंधीच्या बातम्या,लेख वाचण्यास सांगावे.सूचना फलकांवर त्यासंबंधी लेखन करावे.घोषवाक्ये, स्फूर्तिगीते लिहावीत. भित्तीपत्रक तयार करून लावावे.लढणाऱ्या जवानांना पाठिंबा म्हणून पत्रे लिहिणे, निधी पाठविणे, चित्रे पाठविणे, ध्वनिफीत तयार करून पाठविणे, घोषवाक्य निर्मिती स्पर्धा,इ. आवश्य करावे, करण्यास सुचवावे.

**जुलै–ऑगस्ट मधील संपादकांचे दौरे :** दौऱ्यातील प्रमुख ठिकाणे पुढे दिली आहेत. त्या ठिकाणांच्या परिसरातील गावांमध्ये कोणाला काही कार्यक्रम ठरवायचे असल्यास खालील पत्त्यांवर अथवा मुख्य कार्यालयाशी संपर्क साधावा.तसेच स्थानिक कार्यक्रमांचे स्वरूपही खालील पत्त्यांवर कळेल.

**जुलै –** १० ते १३– बोरिवली, पार्ले १७ ते २१– सांगली, इचलकरंजी. २४ ते २७– नाशिक.
**ऑगस्ट –** ६ ते ९ डोंबिवली, बदलापूर. १२ ते १५– धुळे. २७ ते ३०– अलिबाग, नागेठणे.

## स्थानिक संपर्क पत्ते

१. **बोरीवली** — **सौ. अंजली जोशी,** रमणिक टेरेस,कस्तूर पार्क,शिंपोली रोड,बोरीवली (प.) मुंबई ४०००९२. ☎ ८९८६२५९.
२. **सांगली** — **श्री. शैलेंद्र केळकर,** ६९२, गावभाग, खाडिलकर गल्ली, सांगली ४१६४१९. ☎ ३३१३८२
(कु. प्राची दांडेकर. ☎ ३७६०५८, चि. अमर परांजपे. ☎ ७६३६९, चि. मुबारक मुजावर. ☎ ३२०१३३)
३. **इचलकंजी** — **श्री. विनायक गद्रे,**वॉर्ड नं.५, घर नं ६८ अ, झेंडा चौक, इचलकरंजी, जि. कोल्हापूर ४१६११५. ☎ ४२४००८.
४. **नाशिक** — **सौ. साधना गाडगीळ,** रामकृष्णधाम, श्रीरामवाडी, म.गांधी रस्ता, नाशिक ४२२००१. ☎ ५७४८३०.
कु. कविता सागोरे. ☎ ५८१९५१, कु. अमृता देशमुख. ☎ ३१३३८८)
५. **डोंबिवली** — **सौ. सविता सुनील ढोणसळे,**बी १३, कॉमेटकुंज हौ.सो.,टिळकनगर शाळेजवळ,डोंबिवली(पू.), ☎ ४५४६८८.
(सौ.श्रुती फाटक. ☎ ४३५८७३, सौ. अश्विनी मयेकर. ☎ ४७२८३८)
६. **बदलापूर** — श्री. अनिल वझे, १ गरुभक्ती सो., आदर्श विद्यामंदिरासमोर,कुळगाव,बदलापूर, जि. ठाणे. ☎ ६९२५२०
७. **धुळे** — सौ. उषा पाठक,धुळे अर्बन बॅक,गरुड बाग,धुळे ४२४००१
(कु. सुप्रिया पाटील. ☎ २४१६५, कु. सायली गरुड. ☎ ३६६४२)
८. **अलिबाग** — **श्री. राम जोशी,** १ कृष्णविहार, समर्थनगर, पिंपळभाट, अलिबाग ४०२२०१. ☎ २५३०९.
९. **नागोठणे** — **सौ. अंजली विनोद सावंत,** बी २४७,पेट्रोकेमिकल्स टाऊनशीप, ता.पेण, जि.रायगड ४०२१२५. ☎ ७०५२.

---

**छात्र प्रबोधनचे काम आपल्या गावात ज्यांना सुरू करावयाचे आहे, अशांचे स्वागत आहे.**
**त्यांनी त्याबाबत मुख्य कार्यालयाशी पत्रव्यवहार करावा.**

---

हे मासिक,ज्ञान प्रबोधिनी या संस्थेच्या मालकीचे असून मुद्रक,प्रकाशक व संपादक प्रा. महेन्द्र सेठिया यांनी राष्ट्रीय सौर १० आषाढ,शके १९२१,१ जुलै १९९९ या दिवशी बालोद्यान प्रेस,नातुबाग,पुणे येथे छापून ज्ञान प्रबोधिनी, पुणे येथून प्रसिद्ध केले.

**ताठ मान हे भाग्य समज तू, लाचारी कधी शिकू नको, न्यायासाठी लढणारा हो, इमान आपुले विकू नको।**


# क्षणचित्रे-अभ्यासहलीची

**इयत्ता बारावी मुलींची अभ्यासहल**

**५ ते १३ एप्रिल १९९९**

रत्नागिरी-अलिबाग-मुंबई-ठाणे वनवासी भाग


(सहलीचे वृत्त मागील अंकात)



१.



२.



३.



४.



५.



६.



७.



८.



९.



१०.



११.

१. वलसाड (गुजराथ) येथील आपल्या निसर्गशेतीतले प्रयोग दाखवताना-श्री.भास्कर सावे. २.अलिबागचा किल्ला पाहताना ३.आशियातील सर्वांत उंच रेल्वे पूल - पानवळ,जि.रत्नागिरी, (कोकण रेल्वे) ४. 'विधायक संसद'-उसगाव-डोंगरी जि.ठाणेद्वारा, वीटभट्टी कामगारांच्या मुलामुलींसाठी चालविली जाणारी 'भोंगा शाळा' ५. रत्नागिरी येथील समुद्र किनाऱ्यावर जलचर प्राणी-सृष्टी पाहताना-डॉ.जोशींसमवेत ६.जव्हार येथील 'बायफ' संस्थेद्वारा चालविला जाणारा 'वाडी प्रकल्प' पाहताना ७.अलिबाग किल्ला पाहून समुद्रातून परतताना ८. सासवणे येथील करमरकरांच्या अप्रतिम शिल्पालयातील एक शिल्प ९. कोसबाड येथील ग्राममंगल बालवाडी शिक्षक प्रशिक्षण केंद्र दाखवताना-श्रीमती सुषमा पाध्ये १०.अलिबागमधील ५०कि.मी.चा सायकल प्रवास ११.कोसबाड येथील 'विकासवाडी' प्रकल्प पाहताना-शाळेच्या मुख्याध्यापिका व तेथील कार्यकर्त्या श्रीमती सीमा आजगावकर यांच्यासमवेत.

नोंदणी क्रमांक : PHM/22VIII/1997, टपाल नोंदणी क्र. छात्र प्रबोधन; PNCW/349, तिकिटाशिवाय पाठविण्याचा परवाना क्र.- L 128

# हे विश्वात्मक....

हे विश्वात्मक तव भक्ताचा स्वीकारी प्रणिपात
प्रार्थना हीच आज हृदयात!

अंतरात जी वसे हीनता
मोह असूया आणि अहंता
दृढ वज्राने त्यांच्यावरती करि निर्मम आघात!

सुखात किंवा विपदाकाली
अविचल राहो शांति आतली
प्रसन्नतेचे दैवी स्मित रे नित विलसो ओठात!

इवली शल्ये रुपती खुपती
मात करू दे त्यांच्यावरती
प्रगल्भतेचे पंख देऊनी ने ज्योतिर्जगतात!

सेवेतच सार्थक गवसावे
जीवशिवाचे मैत्र जुळावे
विश्वच अवघे सिंचित व्हावे स्नेहामृत सेकात!

आर्तांना हृदयासि धरावे
श्रान्तांसाठी छाया व्हावे
मात्र खलांच्या सत्तेपुढती जुळोत ना कधि हात!

तू दिधलेले हे तेजोबल
सहज तुझ्या चरणांशी वाहिल
अशी लीनता उमलो आता माझ्या मनमर्मात!

**संपर्क पत्ता :**
संपादक, छात्र प्रबोधन
ज्ञान प्रबोधिनी, ५१०, सदाशिव पेठ,
पुणे 411030. ☎ (०२०) ४४७७६९९/४४७८०९५
**कार्यालयाची वेळ** : स. १० ते संध्या. ७
**या अंकाची किंमत** : रु. १०/-
**वार्षिक वर्गणी** : रुपये १२५/-
**प्रकाशन दिनांक** : सौर १० आषाढ, शके १९२१
१ जुलै १९९९